प्रकरण ५

# अन्य राजकीय पक्ष : जनता पक्ष आणि जनता दल

(Other Political Parties in Brief : Janata Party & Janata Dal)

## (अ) जनता पक्ष
(Janata Party)

## मोरारजी देसाई
(Morarji Desai)

संसदीय लोकशाही शासनपद्धतीत दोन तुल्यबळ राजकीय पक्ष अस्तित्वात असणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक मानले जाते. त्यानुसार देशातील सत्ताधारी 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'ला पर्यायी विरोधी पक्ष असण्याची किंवा निर्माण होण्याची गरज जयप्रकाश नारायण यांनी १९५२ मध्ये व्यक्त केली होती. सत्तारूढ पक्षावर अंकुश ठेवू शकेल असा प्रबळ विरोधी पक्ष नसल्यामुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या राज्यकारभारात शिथिलता, गैरशिस्त येऊ लागली. राज्यकर्ते कर्तव्यपालनाच्याबाबत तत्पर राहिले नाहीत. काँग्रेसच्या दीर्घकालीन एकपक्षीय राजवटीमुळे देशात प्रबळ विरोधी पक्ष असण्याची गरज तीव्रतेने भासू लागली.

**पक्षस्थापनेची पार्श्वभूमी :** १९७४ साली बिहार व गुजरात राज्यातील विद्यार्थ्यांनी शासनातील भ्रष्टाचार, वस्तूंच्या वाढत्या किमती, बेरोजगारी आणि आर्थिक दुरवस्था याविरुद्ध तीव्र आंदोलन छेडले. अल्पावधीत त्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप दिले. या जनांदोलनातून १९७७ साली काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून जनता पक्ष जन्माला आला. साम्यवादी पक्ष सोडून देशातील अन्य चार विरोधी पक्षांना एकत्र आणून जयप्रकाश नारायण यांनी जनता पक्षाची उभारणी केली. त्यांच्या मनात अनेक वर्षे घोळत असलेल्या विचाराला अशा प्रकारे मूर्त रूप आले. जयप्रकाशजींच्या प्रेरणेने स्थापन झालेला जनता पक्ष त्यांचे बौद्धिक अपत्य (Brain child) मानले जाते.

सामान्य जनतेच्या मनात अनेक कारणांमुळे खदखदणारा काँग्रेस शासनाबद्दलचा असंतोष विद्यार्थी आंदोलनाच्या रूपाने १९७४ मध्ये प्रकट होऊ लागला. काँग्रेसविरोधी पर्यायी राजकीय पक्षाच्या उभारणीचे जयप्रकाशजींनी वर्षानुवर्षे उराशी बाळगलेले स्वप्न

साकार होण्यास अनुकूलता असल्याचे दिसताच राजकारण संन्यास घेतलेल्या जयप्रकाश नारायण यांनी १९७४ मध्ये सक्रिय राजकारणात उडी घेतली. बिहारमधील विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी स्वत:कडे घेतले. त्यांनी विद्यार्थी आंदोलनाला आपल्या विचाराप्रमाणे दिशा व आकार देऊन 'जनता पक्ष' हा नवीन राजकीय पक्ष जन्माला घातला.

इंदिरा गांधींनी २६ जून, १९७५ च्या सकाळी देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर केली. त्याच दिवशी पहाटे शेकडो विरोधी पक्षनेत्यांना 'अंतर्गत सुरक्षा कायद्या'खाली (मिसा) (Maintenance of Internal Security ACT-MISA) अटक करण्यात आली. १ जानेवारी, १९७७ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधींनी मार्च महिन्यात देशात लोकसभेच्या निवडणुका घेण्यात येतील, असे अचानकपणे जाहीर केले. त्याच वेळी त्यांनी विरोधी पक्षनेते व राजबंदी यांना मुक्त केले. वृत्तपत्रांवरील निर्बंध आणि सभाबंदीसारख्या राजकीय हालचालींवरील निर्बंधही मागे घेण्यात आले. सर्व राजकीय पक्षांना मुक्तपणे निवडणूक प्रचार करण्याची मुभा मिळाली. राजकीय परिस्थितीतील या बदलामुळे जनता पक्षाच्या निर्मितीला गती प्राप्त झाली. १९७४-७५ च्या जनआंदोलनात एकत्र आलेल्या राजकीय पक्षांनी एक नवीन पक्ष स्थापन करून निवडणुका लढविण्याची आवश्यकता असल्याबद्दल त्या पक्षनेत्यांचे एकमत झाले.

**जनता पक्षाची स्थापना**

२० जानेवारी, १९७७ रोजी **लोकदल, समाजवादी पक्ष, जनसंघ व संघटना काँग्रेस** या चार पक्षांच्या नेत्यांनी आगामी निवडणुकीसाठी एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला. नव्याने स्थापन होणाऱ्या पक्षाचे नाव 'जनता पक्ष' असे असावे, त्याचा ध्वज, निवडणूक चिन्ह व कार्यक्रम एक असावा, निवडणुका तोंडावर असल्यामुळे पक्षाची घटना निवडणुकीनंतर तयार केली जावी, असे महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. त्याच बैठकीत मोरारजी देसाई - अध्यक्ष, लालकृष्ण अडवानी - सरचिटणीस व शांतीभूषण - खजिनदार असे पक्षाचे पदाधिकारी ठरविण्यात आले. मोरारजी देसाईंच्या अध्यक्षतेखाली २८ सदस्यीय समितीने उमेदवारांची निवड व पक्षाचा निवडणूक कार्यक्रम ठरवावा, असाही निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला. अकाली दल व साम्यवादी, मार्क्सवादी पक्ष जनता पक्षास सहकार्य करण्यास तयार झाले.

२ फेब्रुवारी, १९७७ रोजी काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेले **जगजीवनराम, हेमवतीनंदन बहुगुणा, नंदिनी सत्पथी** यांच्या **'लोकशाहीवादी काँग्रेस'** (Congress or Democracy) पक्षाने निवडणुकीत जनता पक्षाशी सहकार्य केले. लोकसभा निवडणुकीनंतर हा पक्ष जनता पक्षात विलीन झाला.

## १९७७ ची निवडणूक


मार्च, १९७७ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्ष व त्याचे मित्र पक्ष यांची आघाडी आणि काँग्रेस व तिचे दोन मित्रपक्ष-भारतीय साम्यवादी पक्ष व आण्णा द्रमुक- यांच्यात सरळ सामना झाला. निवडणूक प्रचारात आणीबाणी हाच मुख्य मुद्दा होता. या निवडणुका म्हणजे जणू काही आणीबाणीवरील सार्वमतच आहे, असे वातावरण देशभर निर्माण करण्यात आले होते. निवडणुकांचा निकाल अपेक्षेप्रमाणेच लागला. जनता पक्ष व त्याचे मित्रपक्ष यांना लोकसभेच्या ५४२ पैकी ३३० जागा मिळाल्या. काँग्रेसला फक्त १५४ जागा मिळाल्या. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ७ व अण्णा द्रमुक पक्षाला २१ जागा मिळाल्या. ते दोन पक्ष काँग्रेसचे मित्रपक्ष होते. उत्तर भारतात काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला.

**पक्ष कार्यक्रम :** जनता पक्षाचा निवडणूक कार्यक्रम प्रामुख्याने आंदोलन काळात जनतेला दिलेल्या आश्वासनांवर आधारलेला होता. **गांधीप्रणीत लोकशाही** हे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. (१) आणीबाणीच्या काळात जनतेवर लादलेले निर्बंध दूर करून सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणे. (२) आणीबाणी रद्द करणे. (३) **'भारत सुरक्षा कायद्या'**खाली तुरुंगात डांबलेल्या सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करणे. (४) ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करणे. (५) निवडणूक पद्धतीत सुधारणा करणे. (६) न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य व अधिकार पुन्हा प्रस्थापित करणे. (७) आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसारमाध्यमांना स्वायत्तता देणे. (८) शेतकऱ्यांच्या हितसंबंधांची जपणूक करणे. (९) ग्रामोद्योगांना व लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे. इत्यादी मुद्द्यांचा जनता पक्षाच्या निवडणूक कार्यक्रमात अंतर्भाव केला होता.

लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर जनता पक्षात पंतप्रधान पदाकरिता स्पर्धा सुरू झाली. त्यामुळे जनता पक्षात मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. **पंतप्रधान पदासाठी मोरारजी देसाई, चौधरी चरणसिंग व बाबू जगजीवनराम हे तिघे जण इच्छुक होते.** पंतप्रधान पदासाठी कोणाची निवड करावी याचा निर्णय जनता पक्षातील ज्येष्ठ नेते जयप्रकाश नारायण व आचार्य जे. बी. कृपलानी यांच्यावर सोपविण्यात आला. त्यांनी मोरारजी देसाई यांच्या बाजूने आपला कौल दिला. त्यानुसार २३ मार्च, १९७७ रोजी मोरारजी देसाई भारताचे पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान झाले. चौधरी चरणसिंग यांना उपपंतप्रधान पद देण्यात आले.

**मोरारजी देसाई (जन्म २९ फेब्रुवारी, १८९६ – मृत्यू १० एप्रिल, १९९५)**

मोरारजी देसाई यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग होता. त्यांनी १९७७ ते १९७९ या कालावधीत भारताचे पंतप्रधान पद भूषविले. ते देशाचे पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान ठरले. भारत सरकारच्या 'भारतरत्न' व पाकिस्तानच्या 'निशान–ई–पाकिस्तान' अशा दोन्ही पुरस्काराने सन्मानित झालेले ते एकमेव भारतीय आहेत.



मोरारजी देसाई

मोरारजी देसाईंचा जन्म गुजरातमधील बलसाड जिल्ह्यात ब्राह्मण कुटुंबात झाला होता. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी शासकीय सेवेत प्रवेश केला. परंतु १९२४ साली त्यांनी सरकारी नोकरीचा त्याग करून ब्रिटिश सत्तेविरोधी सुरू असलेल्या देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात ते सहभागी होते. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात त्यांनी अनेक वर्षे कारावास भोगला. १९३७ साली ते काँग्रेसतर्फे मुंबई प्रांतिक कायदेमंडळावर निवडून गेले. १९४६ मध्ये झालेल्या निवडणुकीत ते पुन: विजयी झाले. त्यांनी मुंबई प्रांताचे महसूल मंत्री व गृहमंत्री म्हणून कार्यक्षम कारभार केला. १९५२ साली ते मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांना आपल्या कारकिर्दीत संयुक्त महाराष्ट्र आंदोलन कुशलतेने हाताळता आले नाही. १९५६ नंतर ते देशाच्या राष्ट्रीय राजकारणात सहभागी झाले. काँग्रेस पक्षात त्यांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत गेला. **मोरारजी देसाई कट्टर गांधीवादी नेते होते. मात्र ते सामाजिकदृष्ट्या पुराणमतवादी असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे पाठीराखे होते.** त्यांची विचारसरणी नेहरूंच्या विचारसरणीशी जुळणारी नव्हती.

लालबहादूर शास्त्रींच्या निधनानंतर मोरारजींनी पंतप्रधान पदासाठी इंदिरा गांधींविरुद्ध निवडणूक लढवली होती, परंतु त्या वेळी ते पराभूत झाले. १९६९ साली काँग्रेस पक्षात फूट पडली तेव्हा मोरारजी संघटना काँग्रेसमध्ये सामील झाले. अखेर १९७७ साली वयाच्या ८१ व्या वर्षी मोरारजी देसाईंना देशाचे पंतप्रधान पद भूषविण्याची संधी मिळाली. तेव्हाही त्यांची प्रकृती उत्तम होती आणि त्यांना कोणतीही व्याधी जडलेली नव्हती.

पंतप्रधान पदावरून पायउतार व्हावे लागल्यानंतर मात्र मोरारजीभाई सक्रिय राजकारणातून निवृत्त झाले. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी जनता पक्षाचा प्रचार केला, परंतु स्वत: निवडणूक लढवली नाही.

**जनता पक्ष राजवट**

जनता पक्ष सत्तारूढ झाल्यानंतर पक्षाच्या नेत्यांनी त्याच्या अंतर्गत समस्येवर लक्ष केंद्रित केले. त्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी १ मे, १९७७ रोजी पक्ष सदस्यांचे दिल्लीत खास अधिवेशन आयोजित करण्यात आले. त्यात **चंद्रशेखर –पक्षाध्यक्ष, नानाजी देशमुख, रवी रे, रामकृष्ण हेगडे, मधू लिमये, विजयसिंग नाहर – पक्ष चिटणीस म्हणून निवडले गेले.** तसेच जनता पक्षाची हंगामी कार्यकारणीही निवडण्यात आली. पुढील २८ महिने हीच हंगामी समिती कार्यरत राहिली.

**१. राज्यविधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका :** ज्या राज्यात काँग्रेस लोकसभा निवडणुकीत हरली होती त्या राज्यात सरकारला जनमताचा पाठिंबा नसल्यामुळे काँग्रेस सरकार सत्तेवर राहू शकत नाही, असा युक्तिवाद जनता सरकारने केला. त्याप्रमाणे काँग्रेसची सत्ता असलेल्या नऊ राज्यांतील सरकारे बरखास्त केली व त्या राज्यांत मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा आदेश दिला. १९७७ च्या जूनमध्ये त्या नऊ राज्यांत विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका झाल्या. त्यामध्ये तमिळनाडू वगळता इतर राज्यांत जनता पक्ष व त्यांचे मित्रपक्ष विजयी झाले.

**२. राष्ट्रपतींची बिनविरोध निवड :** संसद व राज्यविधिमंडळे यांच्यातील सदस्य संख्येच्या बळावर जनता पक्षाने राष्ट्रपती पदावर आपले उमेदवार नीलम सजीव रेड्डी यांना बिनविरोध निवडून आणले. २५ जुलै, १९७७ रोजी त्यांनी आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली.

**३. नवीन घटनादुरुस्ती :** आणीबाणीच्या काळात राज्यघटनेत अनावश्यक बदल करणारी ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करण्यासाठी जनता पक्ष सरकारने ४४ वी घटना दुरुस्ती केली. वृत्तपत्रे, राजकीय पक्ष आणि नागरिक यांचे मूलभूत हक्क पुन्हा प्रस्थापित केले गेले. त्यांना नागरी स्वातत्र्य बहाल करण्यात आले. केंद्र व राज्य सरकार यांनी मंजूर केलेल्या कायद्यांची वैधता तपासण्याचे अधिकार अनुक्रमे सर्वोच्च व उच्च न्यायालयांना बहाल करण्यात आले.

**४. जनतेचा भ्रमनिरास :** जनता पक्ष सरकारचे प्रशासन कृतिशील नसल्याचा लोकांचा ग्रह होऊ लागला. विकास धोरणाकडे दुर्लक्ष केले जात असल्याची सरकारवर टीका होऊ

लागली. जनता पक्षावरचा लोकांचा विश्वास उडू लागला व त्याची जागा संतापाने घेतली. असे घडण्याची कारणे पुढीलप्रमाणे होती.

**(अ)** जनता राजवटीत देशाच्या ग्रामीण भागातील सामाजिक तणाव वाढत होते. मात्र त्यावर नियंत्रण ठेवण्यास पक्ष असमर्थ ठरला. जुलै, १९७७ मध्ये **बिहारमधील बेलची येथे दलितांच्यावर अत्याचार झाले**. तेथे दलितांना ठार करून त्यांची घरे पेटविण्यात आली. जनता पक्ष किंवा सरकार असे अत्याचार रोखू शकले नाही.

**(ब)** वीस कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमुळे भूमिहीन मजुरांना मिळालेल्या जमिनी धाकदपटशा दाखवून जमीनदार लोकांनी बळकावयाला सुरुवात केली. ज्यांची कर्जे सरकारने रद्द केली होती त्यांच्याकडून सावकार लोक बळजबरीने कर्जे वसूल करू लागले. असाह्य गरीब लोकांना कोणी आधार दिला नाही.

**(क)** देशातील धार्मिक हिंसाचारांनी उग्र स्वरूप धारण केले.

**(ड)** महाविद्यालयात संप, मोर्चे, हरताळ असे प्रकार वाढले. विद्यापीठे पटापट बंद होऊ लागली. त्यामुळे सर्वत्र बेशिस्त वाढली.

१९७९ च्या मध्यकाळात पोलीस व निम लष्करी दल यांनी संप केले आणि बंड पुकारले. त्यामुळे अराजक निर्माण झाले.

**५. अदूरदर्शी आर्थिक बदल :** जनता सरकारने आर्थिक धोरणात अदूरदर्शी बदल केल्यामुळे '**ग्रामीण विकासाऐवजी उद्योगकेंद्रित**' विकासावर भर दिला जाऊ लागला. त्यामुळे आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला आणि काही बाबतीत देशाची अधोगती झाली.

जनता पक्ष सरकारच्या राजवटीच्या एका वर्षात भारताची अर्थव्यवस्था कुंठितावस्थेकडे वाटचाल करू लागली. देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला. अन्नधान्याच्या किमती भरमसाट वाढल्या. आंतरराष्ट्रीय पातळीवर पेट्रोल व पेट्रोलियम उत्पादनांच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढल्या व त्याचे दुष्परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झाले. १९७९ च्या प्रचंड तुटीच्या अंदाजपत्रकाने देशातील महागाई झपाट्याने वाढू लागली.

जनता पक्ष सरकारने सुरू केलेला एकमेव सकारात्मक आर्थिक कार्यक्रम '**कामाच्या मोबदल्यात धान्य**' हा होता. खेड्यातील बेरोजगार लोकांना काम देण्यासाठी हा अभिनव कार्यक्रम जनता पक्षाने सुरू केला होता. हा कार्यक्रम पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी सरकारने अत्यंत कार्यक्षमतेने राबविला.

**६. परराष्ट्र संबंध :** पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या कार्यकालात पाकिस्तान व चीन या शेजारी देशांशी असलेले भारताचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. १९६२ नंतर प्रथमच चीनशी सामान्य राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्यात आले. १९७७ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट कार्टर यांनी काही अटींवर भारताच्या अणुभट्ट्यां-(न्यूक्लिअर रिॲक्टर्स) साठी देऊ केलेली मदत मोरारजी भाईंनी साफ नाकारली. **इस्राईलचे संरक्षण मंत्री जनरल मोशेदायन** यांनी भारताला गुप्त भेट देऊन त्यांच्या लढाऊ विमानांना भारतात इंधन घेण्याची मागितलेली परवानगी व पाकिस्तानविरोधी प्रस्तावित योजना यालाही मोरारजीभाईंनी नकार देऊन आपला बाणेदारपणा दाखविला.

## जनता पक्षाचे विघटन

भारतीय राजकारणात नवोदित जनता पक्ष प्रभावी ठरण्यासाठी तो एकसंध व एकात्म असावा अशी जयप्रकाश नारायण यांची अपेक्षा होती. त्यासाठी जनता पक्षाच्या सर्व घटक पक्षांनी नव्या पक्षात पूर्णत: विलीन होणे आवश्यक होते. चरणसिंगांचा **'भारतीय लोकदल'** आणि जगजीवनराम यांचा **'लोकशाहीवादी काँग्रेस'** हे दोन पक्ष जनता पक्षात पूर्णत: विलीन होण्यास तयार होते. याउलट, जनसंघ, समाजवादी पक्ष आणि संघटना काँग्रेस या पक्षांचे नेते संपूर्ण विलीनीकरणास तयार नव्हते. जनता पक्षाच्या छत्राखाली एकत्र आलेले राजकीय पक्ष परस्परांविषयी साशंक होते. त्याचप्रमाणे त्यांचे वैचारिक दृष्टिकोण विभिन्न होते. विलीनीकरणानंतर जनता पक्षाचे धोरण काय राहील याविषयी सर्वच पक्षांना अनिश्चितता वाटत होती. संघटना काँग्रेसला नवा पक्ष आपल्या वर्चस्वाखाली असावा असे वाटत होते. जनसंघाचाही तोच प्रयत्न होता. नव्या पक्षाला समाजवादी तात्त्विक बैठक द्यावी अशी समाजवाद्यांची इच्छा होती. अशा मतमतांतरांतून दुहेरी सदस्यत्वाची कल्पना पुढे आली. त्याला भारतीय लोकदल पक्षाचा तीव्र विरोध झाल्यामुळे जनता पक्षातील घटकांचे संपूर्ण ऐक्य हे मृगजळ ठरले. जनता पक्षातील घटकांना एकत्र ठेवणारा कोणताही तात्त्विक दुवा नव्हता. काँग्रेस व इंदिरा गांधी यांचा द्वेष आणि सत्ताभिलाषा या दोन मुद्द्यांवर जनता पक्षाचे सर्व घटक एकत्र आले होते असे दिसते.

सर्व पक्षांना एकत्र ठेवणारा दुवा नव्हता
फक्त इंदिरा गांधींना विरोध

शासनाच्या धोरणाबाबत पंतप्रधान मोरारजी देसाई व उपपंतप्रधान चरणसिंग यांच्यामध्ये टोकाचे मतभेद होऊ लागले. १९७८ साली हे मतभेद विकोपाला गेले आणि चरणसिंगांनी राजनारायण यांना बरोबर घेऊन जनता पक्षात बंड पुकारले. त्यांनी जनता पक्षाच्या कार्यकारणीचा व संसदीय मंडळाचा राजीनामा दिला. १९७८-७९ मध्ये जनता

पंतप्रधान व उपपंतप्रधान मतभेद
उपपंतप्रधान राजीनामा

पक्षातील वादविवाद, अंतर्गत कलह खूप वाढले. केंद्रशासनाचे आसन डळमळीत झाले. अशा परिस्थितीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते काँग्रेसचे यशवंतराव चव्हाण यांनी सरकारवर अविश्वासाचा ठराव मांडला. अनपेक्षितपणे अविश्वास ठराव बहुमताने मंजूर झाला. मोरारजी देसाई सरकारने राजीनामा दिला. त्यानंतर राष्ट्रपतींनी विरोधी पक्षनेते यशवंतराव चव्हाण यांना सरकार बनविण्यासाठी पाचारण केले. तथापि, ते आपल्यामागे लोकसभेतील बहुमत उभे करू शकले नाहीत. त्यानंतर चरणसिंगांनी काँग्रेस (यू.) मधील चव्हाण गट व काही समाजवाद्यांच्या मदतीने सरकार बनवले. काँग्रेस (आय) व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या सरकारला बाहेरून पाठिंबा दिला. परंतु विश्वासदर्शक ठरावाच्या अगोदर काँग्रेस (आय) ने सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यानंतर राष्ट्रपतींनी चरणसिंगांच्या सल्ल्यानुसार लोकसभा बरखास्त करून मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या. तथापि, चरणसिंगांना काळजीवाहू पंतप्रधान या नात्याने स्वातंत्र्यदिनाचे लाल किल्ल्यावरील ध्वजारोहण करून राष्ट्राला उद्देशून भाषण करण्याची संधी मिळाली.

चरणसिंगांनी जनता पक्ष सोडल्यानंतर आपल्या पक्षाचे लोकदल असे नाव ठरविले. 'भारतीय लोकदल' पक्षाच्या निर्मितीनंतर कर्पूरी ठाकूर, मधू लिमये व जॉर्ज फर्नांडिस या समाजवादी नेत्यांनी त्या पक्षात प्रवेश केला. **नंतर जनसंघानेही जनता पक्षाशी फारकत घेऊन 'भारतीय जनता पक्ष' हे नवे नाव धारण केले.** १९७७ साली स्थापन झालेल्या जनता पक्षात संघटना काँग्रेस व काही समाजवादी नेते तेवढे शिल्लक राहिले. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनता पक्षाचा दणंदणीत पराभव झाला व त्यानंतर त्या पक्षाचा प्रभाव कमी-कमी होत गेला. काँग्रेसला शह देऊ शकणारा पर्यायी पक्ष म्हणून जनता पक्षाने कार्य करावे ही जयप्रकाश नारायण यांची अपेक्षा भंग पावली.

## (ब) जनता दल
### (Janata Dal)

## विश्वनाथ प्रताप सिंग
### (V. P. Singh)

भारतातील आघाड्यांच्या राजकारणाचे जनक मानले जाणारे विश्वनाथ प्रताप सिंग (२५ जून, १९३१ - २७ नोव्हेंबर, २००८) हे भारताचे आठवे पंतप्रधान होते. २ डिसेंबर, १९९० ते १० नोव्हेंबर, १९९१ हा त्यांचा पंतप्रधान पदाचा कार्यकाल होता.



व्ही. पी. सिंग

**पूर्वायुष्य :** व्ही. पी. सिंग यांचा जन्म २५ जून, १९३१ रोजी अलाहाबादमध्ये एका जमीनदार कुटुंबात झाला. वयाच्या ५ व्या वर्षी त्यांना उत्तर प्रदेशमधील मंडा या लहान राज्याचे रजपूत जहागीरदार महाराज बहादूर राम गोपाल सिंग यांनी दत्तक घेतले. त्यांचे शिक्षण **कर्नल ब्राऊन केंब्रिज स्कूल, डेहराडून, उदय प्रताप कॉलेज, वाराणसी आणि फर्ग्युसन कॉलेज, पुणे** येथे झाले. ते कायद्याचे पदवीधर होते. तसेच त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून भौतिकशास्त्र विषयात पदवी संपादन केली होती. अणुशास्त्रज्ञ होऊन संशोधन करण्याची त्यांची आकांक्षा होती.

## प्रारंभीची राजकीय कारकीर्द

जवाहरलाल नेहरूंच्या काळात व्ही. पी. सिंग यांनी अलाहाबादच्या स्थानिक राजकारणात प्रवेश केला. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून केलेल्या कामामुळे त्यांची सावर्जनिक जीवनात चांगली प्रतिमा तयार झाली. अल्पावधीत उत्तर प्रदेशच्या काँग्रेस संघटनेत त्यांचा चांगला लौकिक झाला. त्यामुळे १९६९ साली ते काँग्रेस पक्षातर्फे उत्तर प्रदेश विधानसभेवर निवडून गेले. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून विजयी झाले. १९७४ साली इंदिरा गांधींनी व्यापार खात्याचे उपमंत्री म्हणून व्ही. पी. सिंग यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश केला. १९७६–७७ मध्ये ते त्याच खात्याचे मंत्री बनले.

१९८० साली इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधानपदी पुनःश्च विराजमान झाल्या. त्या वेळी त्यांनी व्ही. पी. सिंग यांची उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून नेमणूक केली. १९८०–८२ या कालावधीत त्यांनी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळला. त्या काळात नैर्ऋत्य उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागात डाकू, दरोडेखोरांचा भयंकर उपद्रव वाढला होता. सामान्य जनता त्यामुळे भयभीत झाली होती. व्ही. पी. सिंगनी दरोडेखोरांच्या विरुद्ध कठोर मोहीम राबविली. दरोडेखोरांना पकडणे किंवा सुधारणे या बाबतीत त्यांना अपयश आले. उलट, दरोडेखोरांनी त्यांच्या भावाची हत्या केली. परिणामतः व्ही. पी.

सिंग यांनी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. १९८३ मध्ये त्यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात व्यापार खात्याचे मंत्री म्हणून पुन्हा समावेश करण्यात आला.

१९८४–८७ या कालावधीत व्ही. पी. सिंग राजीव गांधींच्या कॅबिनेटमध्ये अर्थमंत्री होते. त्यांनी अर्थखात्यात काही चांगल्या सुधारणा केल्या. पंतप्रधानांच्या निर्देशाप्रमाणे त्यांनी सरकारच्या परवाना राजवटीत (Licence Raj) हळूहळू शिथिलता आणली. कर बुडवेगिरी करणाऱ्या देशातील बड्या असामींच्यावर अचानक छापे टाकण्याचे सत्र त्यांनी सुरू केले. आयकर खात्याच्या धाडी पडलेल्या बड्या मंडळीत **धिरूभाई** अंबानी, **अमिताभ बच्चन** अशांचाही समावेश होता. निवडणुकीत काँग्रेस पक्षाला आर्थिक मदत करणाऱ्या उद्योगपतींच्यावरही आयकर विभागाच्या धाडी पडल्या. त्यामुळे पंतप्रधान काहीसे अस्वस्थ झाले. त्या वेळी व्ही. पी. सिंग यांची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती. त्यामुळे अशा स्थितीत व्ही. पी. सिंग यांचे खाते बदलणे याशिवाय पंतप्रधान काही करू शकत नव्हते. त्याप्रमाणे जानेवारी, १९८७ मध्ये राजीव गांधींनी व्ही. पी. सिंग यांच्याकडील अर्थखाते काढून घेऊन त्यांची संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती केली.

संरक्षणमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर व्ही. पी. सिंग यांनी संरक्षण साहित्य खरेदी संदर्भात भूतकाळात झालेल्या व्यवहारांची बारकाईने छाननी सुरू केली. त्यामध्ये त्यांना काही गोष्टी संशयास्पद वाटल्या. H.D.W पाणबुड्या खरेदी व्यवहार हे त्यापैकी एक प्रकरण होते. १९८१ मध्ये भारत सरकारने पश्चिम जर्मनीकडून H.D.W पाणबुड्या खरेदी केल्या होत्या. तेव्हा काँग्रेस सत्तेत होती व संरक्षण खाते खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधींकडे होते. व्ही. पी. सिंग संरक्षणमंत्री असताना आणखीन दोन H.D.W पाणबुड्या खरेदीचा प्रस्ताव त्यांच्यासमोर आला. पाणबुड्यांच्या किमतीत अधिक सवलत मिळावी अशी भारताने कंपनीकडे मागणी केली. तेव्हा जर्मन कंपनीने भारताची मागणी फेटाळली आणि मागील व्यवहाराच्या वेळी दिलेले ७ टक्के कमिशन जास्तच होते, असे सांगितले. त्यावर संरक्षणमंत्र्यांनी पंतप्रधानांशी काही चर्चा न करताच पूर्वीच्या पाणबुडी खरेदी व्यवहाराच्या चौकशीचे आदेश दिले. त्यामुळे पंतप्रधान नाराज झाले. मंत्रिमंडळ बैठकीत व्ही. पी. सिंग यांच्या कृतीबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यामुळे व्ही. पी. सिंग यांनी तत्काळ संरक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला. सरकारचे विरोधक व वृत्तपत्रांसाठी सरकारला अडचणीत आणण्याची आयती संधी मिळावी. व्ही. पी. सिंग प्रामाणिक आहेत आणि राजीव गांधी सत्य लपवत आहेत, असा उघड आरोप केला जाऊ लागला. राजीव गांधी Mr clean नसून व्ही. पी. सिंग Mr clean आहेत असा प्रचार सुरू झाला.

१६ एप्रिल, १९८७ रोजी व्ही. पी. सिंग यांनी संरक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्या पाठोपाठ त्यांनी काँग्रेस पक्ष व लोकसभा सदस्यत्वाचाही राजीनामा दिला.

## जनता दलाची निर्मिती

१९८७ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर व्ही. पी. सिंग यांनी सातत्याने भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष सुरू केला. सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार या अत्यंत संवेदनशील विषयाला त्यांनी हात घातल्यामुळे देशातील जनमत त्यांच्या बाजूला झुकत चालले होते. त्याच वेळी बोफोर्स प्रकरण आणि शाहबानो खटला यामुळे पंतप्रधान राजीव गांधींची लोकप्रियता झपाट्याने घटली होती. उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचारामुळे खालच्या स्तरावरील सरकारी नोकरांचे फावते, हा ग्रह लोकांच्या मनात पक्का झाला होता.

व्ही. पी. सिंग यांनी राजीव गांधी व त्यांचे सरकार यांच्याविरुद्ध देशभर प्रचाराची मोठी आघाडी उघडली होती. त्यांनी सर्वोदयी कार्यकर्ते, दत्ता सामंतासारखा कामगार नेता, महाराष्ट्रातील शरद जोशीसारखे शेतकऱ्यांचे नेते व काही काँग्रेस विरोधी बुद्धिजीवी अशा गटांना आपल्याकडे ओढले.

राजीव गांधींवर नाराज असलेल्या अरिफ मोहमंद, अरुण नेहरू, विद्याचरण शुक्ल, सतपाल मलिकसारख्या काँग्रेस नेत्यांना त्यांनी आपल्या बाजूला वळविले.

२ ऑक्टोबर, १९८७ रोजी व्ही. पी. सिंग यांनी **'जनमोर्चा'** या विरोधी पक्षाची स्थापना केली आणि राजीव गांधींविरुद्ध रणशिंग फुंकले. त्यानतर त्यांनी जून, १९८८ मध्ये अलाहाबादमधून लोकसभेची पोटनिवडणूक लढविली. काँग्रेसच्या सुनील शास्त्रींचा पराभव करून ते त्या निवडणुकीत विजयी झाले.

काँग्रेस विरोधी सर्व पक्षांना एकत्र आणण्यासाठी व्ही. पी. सिंग यांनी एक त्रिस्तरीय व्यूहरचना निश्चित केली. त्यानुसार,

१. बिगर काँग्रेस धर्मनिरपेक्ष (मध्यममार्ग विचाराचे) गट एकत्र आणणे.

२. डाव्या विचारांचे धर्मनिरपेक्ष पक्ष सोडून इतर सर्व प्रादेशिक व राष्ट्रीय गट यांची आघाडी तयार करणे.

३. डावे पक्ष आणि भाजप यांच्याशी जागांबाबत समझोता घडवून आणणे. असे धोरण आखले. होते.

११ ऑक्टोबर, १९८८ रोजी **जयप्रकाश नारायण यांच्या जन्मदिनी** सरकारविरोधी सर्व मध्यममार्गी पक्षांना एकत्र आणण्यासाठी व्ही. पी. सिंग यांनी **'जनता दला'ची**

११८ ज 1988 जनता दलाची स्थापना - V. P. Singh



**स्थापना केली.** त्यामध्ये जनमोर्चा, जनता पक्ष, लोकदल व काँग्रेस (एस) यांचा समावेश होता. व्ही. पी. सिंग यांची जनता दलाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर **जनता दलासह सात पक्षांची 'राष्ट्रीय आघाडी'** (National Front) तयार करण्यात आली. त्यामध्ये द्रवीड मुन्नेथ, कळघम, द्रमुक, तेलगू देसम, आसाम गणपरिषद या प्रादेशिक पक्षांचाही समावेश होता. **राष्ट्रीय आघाडीचे व्ही. पी. सिंग – समन्वयक, एन. टी. रामाराव – अध्यक्ष आणि पी. उपेंद्र – जनरल सेक्रेटरी होते.**

जनता दल असलेली राष्ट्रीय आघाडी आणि भारतीय जनता पक्ष यांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभा न करण्याचा समझोता करण्यात आला आणि ८५ टक्के जागाबाबत तो प्रत्यक्षात आला. काही जागाबाबत राष्ट्रीय आघाडी व साम्यवादी यांच्यात समझोता झाला.

## विधानसभा निवडणुका 1990

जनता दल 52 राज्यात सत्ता

मार्च, १९९० मध्ये अनेक राज्यांत विधिमंडळाच्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये जनता दल हरियाणा, गुजरात, ओडिसा, बिहार आणि उत्तर प्रदेश या पाच राज्यांत सत्तेवर आले. त्या राज्यांत जनता दलाच्या शासनाचे नेतृत्व अनुक्रमे ओमप्रकाश चौताला, चिमणभाई पटेल, बिजू पटनाईक, लालूप्रसाद यादव व मुलायमसिंग यादव यांनी केले. शिवाय राष्ट्रीय मोर्चाचे घटक पक्ष द्रमुक, तेलगू देसम व आसाम गणपरिषद तमिळनाडू, आंध्र व आसाम राज्यांत सत्तेवर आले. केरळ व राजस्थानमध्ये जनता दलाचा सत्तेत सहभाग होता. १९९० मधील राज्य विधानसभांच्या निवडणुकीनंतर व्ही. पी. सिंग यांच्या सत्ताधारी राष्ट्रीय आघाडीने संसदेच्या दोन्ही सभागृहात आपले वर्चस्व निर्माण केले.

## राष्ट्रीय आघाडीचे संमिश्र सरकार (१९८९–९०)

१९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रीय आघाडी एकमेकांविरुद्ध लढले. त्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला १९७, राष्ट्रीय आघाडीला १४६ जागा मिळाल्या. भाजपला ८६ तर डाव्या पक्षांना ५२ जागा मिळाल्या. लोकसभेत काँग्रेसच सर्वांत मोठा पक्ष होता, परंतु काँग्रेस सरकार बनविण्यास उत्सुक नसल्याचे राजीव गांधींनी स्पष्ट केले. डावे पक्ष व भाजप यांनी राष्ट्रीय आघाडी (National Front) सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचे जाहीर केले. त्यामुळे व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे स्वतंत्र भारतातील दुसरे बिगर काँग्रेस सरकार अस्तित्वात आले. राष्ट्रीय मोर्चात व्ही. पी. सिंग पंतप्रधान होण्यास जनता दलातील त्यांचे प्रतिस्पर्धी चंद्रशेखर यांचा पाठिंबा

नव्हता. तथापि, बऱ्याच प्रयत्नानंतर व्ही. पी. सिंग पंतप्रधान व देवीलाल उपपंतप्रधान झाले. २ डिसेंबर, १९८९ रोजी त्या दोघांचा शपथविधी पार पडला व दोघांनी पदग्रहण केले.

**(अ)** व्ही. पी. सिंग यांनी काश्मीरमधील नेते मुफ्ती महंमद सईद यांना गृहमंत्री पद दिले. ते देशाचे पहिले मुस्लीम गृहमंत्री ठरले. व्ही. पी. सिंग यांनी सत्ताग्रहण केल्यानंतर काही दिवसातच त्यांना एका गंभीर पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागले. गृहमंत्री व जम्मू-काश्मीरचे माजी (व विद्यमानही) मुख्यमंत्री मुफ्ती महंमद सईद यांच्या डॉक्टर रुबैय्या या कन्येचे दहशतवाद्यांनी अपहरण केले. तिच्या सुटकेसाठी भारताच्या ताब्यात असलेल्या काही कट्टर अतिरेक्यांना सोडून देण्याची अट सरकारला मान्य करावी लागली. त्यामुळे व्ही. पी. सिंग सरकारची जनमानसातील प्रतिमा डागळली.

**(ब)** पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांना **पंजाब** व **काश्मीर**मधील दहशतवाद व फुटीरतावाद यांना तोंड द्यावे लागले. त्यांनी प्रथम अमृतसर येथील सुवर्णमंदिरास भेट दिली. ऑपरेशन ब्ल्यू स्टारमुळे दुखावलेल्या शीख बांधवांना दिलासा देण्यासाठी ही भेट होती. तेथे ते उघड्या जीपमधून फिरले. त्याचा बराच गाजावाजा झाला. काँग्रेसच्या धोरणातील विसंगती त्यांनी उघड केली. व्ही. पी. सिंग प्रशासनाकडून केवळ पोकळ शब्दांची खैरात करण्यात आली, परंतु प्रत्यक्ष हाती काहीच लागले नाही. त्यांची पंतप्रधान पदाची कारकीर्द संपली तेव्हा पंजाबची स्थिती पूर्वीपेक्षा जास्त बिघडलेली होती.

१९८९-९० मध्ये काश्मीरचा प्रश्नही बराच चिघळला होता. पंतप्रधानांनी काश्मीरविषयक एक समिती जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली नेमली होती. परंतु अरुण नेहरू व मुफ्ती महंमद सईद यांचा काश्मीर प्रकरणात सतत हस्तक्षेप होत असे. अशा परिस्थितीत व्ही. पी. सिंगनी कोणाशी चर्चा न करता जगमोहन यांना काश्मीरचे राज्यपाल म्हणून नेमले. भाजपच्या दबावामुळे जगमोहन यांची नेमणूक झाल्याचेही बोलले जात होते. राज्यपाल नेमणुकीच्या निषेधार्थ शेख अब्दुल्ला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. जगमोहन यांच्यामुळे १९८३ मध्ये डॉ. फारूक अब्दुल्ला यांना मुख्यमंत्री पद गमवावे लागले होते. जगमोहन यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर तातडीने काश्मीर विधानसभा स्वतःच्या मनाने बरखास्त केली. व्ही. पी. सिंग यांनी जगमोहन यांना तातडीने परत बोलावले. देशाचे गृहमंत्री काश्मीरचे असूनही तो प्रश्न हाताळण्यात व्ही. पी. सिंग सरकार अपयशी ठरले.

**(क) परराष्ट्र व्यवहार :** श्रीलंकेत पाठविण्यात आलेल्या भारतीय शांतिसेनेच्या

तुकड्या परत आणण्याची राजीव गांधी सरकारने सुरू केलेली प्रक्रिया व्ही. पी. सिंग यांच्या कार्यकाळात पूर्ण झाली.

शेजारी देश नेपाळबरोबर व्यापाराबाबत असलेला तंटा संपविण्यासाठी तडजोडीने त्यावर मार्ग काढण्यात आला.

**(ड) मंत्रिमंडळातील मतभेद :** व्ही. पी. सिंग यांचे मंत्रिमंडळ एकजिनसी नव्हते. मंत्रिमंडळात बरेच अंतर्गत मतभेद होते आणि ते सोडविण्यातच या सरकारची शक्ती व वेळ खर्च होत होता. त्यामुळे व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखालचे संमिश्र सरकार कोणतीच भरीव कामगिरी करू शकले नाही. पंतप्रधानांच्यावर ज्येष्ठ नेते चंद्रशेखर उघड टीका करीत असत तर उपपंतप्रधान देवीलाल सहकारी मंत्री अजित सिंग (माजी पंतप्रधान चरणसिंग यांचे पुत्र) यांचा द्वेष करीत होते. चंद्रशेखर सोडून जनता दलातील सर्व जण देवीलाल यांचा तिरस्कार करीत होते. देवीलाल उपपंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी आपले पुत्र ओमप्रकाश चौताला यांना हरियाणाचे मुख्यमंत्री बनविले. मुलाचे मुख्यमंत्री पद टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या उपद्व्यापामुळे सत्ताधारी पक्षात प्रचंड मतभेद निर्माण झाले. पक्षांतर्गत संघर्षात देवीलाल यांनी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनाही गुंतविण्याचा प्रयत्न केला. देवीलाल यांच्या कट कारस्थानांचा उबग येऊन व्ही. पी. सिंगनी १ ऑगस्ट, १९९० साली देवीलाल यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ केले. त्यानंतर व्ही. पी. सिंगना शह देण्यासाठी आणि आपले शक्तीप्रदर्शन करण्यासाठी देवीलालनी ९ ऑगस्ट रोजी दिल्लीत शेतकऱ्यांचा भव्य मेळावा आयोजित केला.

**(इ) मंडल आयोग शिफारशी :** माजी उपपंतप्रधान देवीलाल यांच्या हालचालीवरून लोकांचे मत दुसरीकडे वळविण्याच्या उद्देशाने पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी आपल्या कारकिर्दीतील सर्वात विवाद्य असा निर्णय जाहीर केला. ७ ऑगस्ट, १९९० रोजी त्यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी आपले सरकार अमलात आणेल असे जाहीर केले.

१९७७–७९ मधील जनता राजवटीत **बिंदेश्वरी प्रसाद मंडल आयोगाची** नेमणूक करण्यात आली होती. १९८३ साली सदर आयोगाने केंद्र सरकारला आपला अहवाल सादर केला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कोणाच्या लक्षात येऊ न देता हा अहवाल गुंडाळून ठेवला होता. व्ही. पी. सिंग यांनी आपल्या पक्षांतर्गत विरोधकांवर मात करण्यासाठी मंडल आयोग अहवालाचा हत्यारासारखा वापर केला.

मंडल आयोगाने आपल्या शिफारशीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांत मागासवर्गीयांसाठी आणखी २७ टक्के जागा राखीव ठेवण्याची शिफारस केली होती.

राज्यघटनेतील तरतुदींनुसार अनुसूचित जातीजमातीसाठी २२.५ टक्के जागा राखीव होत्या. आयोगाच्या शिफारसीनुसार आणखी २७ टक्के जागा राखीव ठेवल्यानंतर एकूण राखीव जागांची संख्या ४९.५ टक्के इतकी होणार होती. दुसऱ्या टप्प्यात हा नियम शैक्षणिक संस्था आणि पदोन्नती यांनाही लागू होणार होता.

व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी अमलात आणण्याचा निर्णय जाहीर करताच संपूर्ण देशभर संताप व असंतोषाची लाट उसळली. जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चा यामधील ज्येष्ठ नेते, सहकारी या निर्णयामुळे व्ही. पी. सिंगांच्यावर नाराज झाले. सदर निर्णयाची कसलीही पूर्वकल्पना न दिल्यामुळे भाजप व डावे पक्षही त्यांच्यावर नाराज झाले. मंडल आयोगामुळे सामाजिक न्यायाच्या नावाखाली जाती-जमातींमध्ये वैमनस्य वाढण्याची भीती निर्माण झाली. असा महत्त्वाचा सामाजिक निर्णय सर्वांगीण चर्चेनंतर घेणे उचित ठरले असते, असा सूर उमटू लागला.

व्ही. पी. सिंग यांच्या निर्णयानंतर उत्तर भारतात विद्यार्थ्यांनी प्रचंड व हिंसात्मक निदर्शने केली. मंडल विरोधी चळवळीने हिंसात्मक स्वरूप धारण केले. सार्वजनिक मालमत्तेची चळवळीत प्रचंड नासधूस झाली. भारतात सरकारी क्षेत्र हे एकच क्षेत्र लोकांना नोकऱ्या उपलब्ध असू शकणारे होते. त्या क्षेत्रात जवळजवळ ५० टक्के जागा आरक्षित म्हणून जाहीर व्हाव्यात हे तरुण विद्यार्थ्यांना अन्यायकारक वाटत होते. अन्य क्षेत्रांत नोकरीसाठी लाचलुचपत, वशिला, लागेबंधे यांची आवश्यकता असते व तेथे असुरक्षितता व अनिश्चितता असते.

पंतप्रधानांच्या मंडल आयोगाच्या निर्णयावर सत्ताधारी राष्ट्रीय आघाडीत वादविवाद सुरू झाले. त्यातून पंतप्रधानांचा निर्णय राजकीय हेतूने प्रेरित होता असे ध्वनित होत होते. १ ऑक्टोबर, १९९० रोजी मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीस सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली व त्यामुळे आंदोलनाचे वादळ शमले.

**(ई) राम जन्मभूमी आंदोलन :** मंडल आयोगाच्या संदर्भात झालेल्या घडामोडींचा फायदा करून घेण्याचे भारतीय जनता पक्षाने ठरवले. कट्टर हिंदुत्ववादी संघटनांना एकत्र करून आपली ताकद वाढविण्यासाठी भाजपने राम जन्मभूमी आंदोलन पुन्हा छेडले. त्यासाठी भाजपा अध्यक्ष लालकृष्ण अडवाणी यांनी प्रमोद महाजनांना बरोबर घेऊन गुजरातमधील सोमनाथ ते उत्तर प्रदेशातील अयोध्या अशी ६००० मैलांची रथयात्रा हाती घेतली. २५ सप्टेंबर रोजी रथयात्रा सुरू झाली. परंतु २३ ऑक्टोबर रोजी बिहारमधील समस्तीपूर येथे ही यात्रा अडविण्यात आली. अडवाणींना अटक करण्यात आली व त्यांची रथयात्रा तेथे संपली. अडवाणींच्या रथयात्रेमुळे सार्वजनिक शांततेचा भंग होतो व

सांप्रदायिक तणाव वाढतो अशी भूमिका घेऊन बिहार सरकारने सदर कारवाई केली. व्ही. पी. सिंग यांच्या सूचनेप्रमाणे लालूप्रसाद यादव यांच्या सरकारने अडवाणींची रथयात्रा अडवून त्यांना अटक करण्याची कारवाई केली हे उघड होते. त्यामुळे राष्ट्रीय आघाडीला असलेला पाठिंबा भाजपने काढून घेतला. त्याच वेळी भाजपबरोबरचे संबंध तोडण्याचा व्ही. पी. सिंग यांनी निर्णय घेतला.

३० ऑक्टोबर रोजी राम मंदिराच्या शिलान्यास स्थळी जाण्यासाठी अयोध्या येथे जमलेल्या कारसेवकांच्या समुदायावर गोळीबार करण्यात आला. अडवाणींची रथयात्रा, त्यांना झालेली अटक आणि अयोध्येतील गोळीबार अशा विविध कारणांमुळे उत्तर भारतात धार्मिक दंगली भडकल्या. त्यात अनेक जण मृत्युमुखी पडले.

**व्ही. पी. सिंगांचा राजीनामा :** राष्ट्रीय आघाडीला दिलेला पाठिंबा भाजपने काढून घेतला. त्यानंतर ५ नोव्हेंबरला जनता दलात फूट पडली. ५८ सदस्यांनी चंद्रशेखर यांची गट नेता म्हणून निवड केली. त्यामुळे पंतप्रधान एकाकी पडले. लोकसभेत व्ही. पी. सिंग सरकारावर अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला. तो १४२ विरुद्ध ३४६ मतांनी मंजूर झाला. परिणामत: ७ नोव्हेंबर, १९९० रोजी विश्वनाथ प्रताप सिंग यांनी आपल्या सरकारचा राजीनामा सादर केला. त्याबरोबरच केंद्रात बिगर काँग्रेस सरकार चालविण्याचा दुसरा प्रयोग संपुष्टात आला. व्ही. पी. सिंग सरकारचा अकरा महिन्यांचा कार्यकाल वादळी ठरला. त्यानंतर चंद्रशेखर यांनी काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार बनवले. १० नोव्हेंबर, १९९० रोजी चंद्रशेखर यांचे सरकार सत्तारूढ झाले. चंद्रशेखर भारताचे पंतप्रधान झाले. ५ मार्च, १९९१ रोजी काँग्रेसने चंद्रशेखर यांच्या सरकारचा पाठिंबा काढून घेतला व हे सरकार कोसळले.

मे, १९९१ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत व्ही. पी. सिंग यांचा सक्रिय भाग होता. मात्र त्यांच्या जनता दल पक्षाची या निवडणुकीत बरीच पीछेहाट झाली. त्यानंतर ते सक्रिय राजकारणातून निवृत्त झाले. १९९६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी काँग्रेस पक्ष पराभूत झाला. विरोधी पक्षांची **'संयुक्त आघाडी'** (United Front) सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत होती. त्या वेळी संयुक्त आघाडीने पंतप्रधान पदासाठी व्ही. पी. सिंग यांचे नाव निश्चित केले होते, परंतु त्यांनी त्याला नकार दिला. देवेगौडा यांच्या राजीनाम्यानंतर व्ही. पी. सिंग यांच्या शिफारशीमुळे इंद्रकुमार गुजराल यांची संयुक्त आघाडीने पंतप्रधानपदी निवड केली. १९९१ मध्ये व्ही. पी. सिंग यांना कर्करोग झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ते सार्वजनिक जीवनातून दूर झाले. त्यांना काव्य व चित्रकला यांच्यात अभिरुची होती. २७ नोव्हेंबर, २००८ रोजी त्यांचे दिल्लीच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये निधन झाले.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. ..... जनता पक्षाचे पहिले अध्यक्ष होते.

*(अ) जयप्रकाश नारायण* *(ब) चंद्रशेखर*

*(क) मोरारजी देसाई* *(ड) राजनारायण*

२. लोकशाहीवादी काँग्रेस पक्षात .... यांचा समावेश नव्हता.

*(अ) जगजीवनराम* *(ब) हेमवतीनंदन बहुगुणा*

*(क) नंदिनी सत्पथी* *(ड) यशवंतराव चव्हाण*

३. ...... मध्ये जनता पक्षाची स्थापना करण्यात आली.

*(अ) १९७४* *(ब) १९७५* *(क) १९७६* *(ड) १९७७*

४. 'कामाच्या मोबदल्यात धान्य' या कार्यक्रमाची .... मध्ये यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.

*(अ) बंगाल* *(ब) बिहार* *(क) महाराष्ट्र* *(ड) तमिळनाडू*

५. मोरारजी देसाई सरकारवर .... मध्ये अविश्वास ठराव मंजूर झाला.

*(अ) १९७७* *(ब) १९७८* *(क) १९७९* *(ड) १९८०*

६. 'जनमोर्चा'ची ...... मध्ये स्थापना करण्यात आली.

*(अ) जून, १९८७* *(ब) जुलै, १९८७*

*(क) सप्टेंबर, १९८७* *(ड) ऑक्टोबर, १९८७*

७. .... जनता दलाचे अध्यक्ष होते.

*(अ) चंद्रशेखर* *(ब) व्ही. पी. सिंग*

*(क) एन. टी. रामाराव* *(ड) लालूप्रसाद यादव*

८. मंडल आयोगाची नेमणूक ..... सरकारने केली होती.

*(अ) काँग्रेस* *(ब) जनता पक्ष* *(क) जनता दल* *(ड) राष्ट्रीय आघाडी*

९. लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा ... येथून सुरू झाली.

*(अ) द्वारका* *(ब) मथुरा* *(क) सोमनाथ* *(ड) वेरावळ*

१०. लालकृष्ण अडवाणींच्या रथयात्रेच्या वेळी ...... गुजरातचे मुख्यमंत्री होते.

*(अ) केशुभाई पटेल* *(ब) चिमणभाई पटेल*

*(क) शंकरसिंघ वाघेला* *(ड) नरेंद्र मोदी*

११. अयोध्या .... राज्यात आहे.

*(अ) मध्य प्रदेश (ब) उत्तर प्रदेश (क) बिहार (ड) उत्तराखंड*

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) जयप्रकाश नारायण (ब) जनता पक्षाचा निवडणूक कार्यक्रम

(क) मोरारजी देसाई (ड) जनता पक्षाचे विघटन

(इ) १९७७ ची लोकसभा निवडणूक

(फ) जनता राजवटीतील आर्थिक बदल

(य) जनता दल

(र) काश्मीरमधील १९८९-९० मधील घडामोडी

(ल) राष्ट्रीय आघाडी

(व) मंडल आयोग

(श) लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा

(ह) चंद्रशेखर.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. जनता पक्षाच्या स्थापनेला कारणीभूत घटकांची चर्चा करा.

२. मोरारजी देसाईंच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

३. जनता पक्षाच्या अपयशाची मीमांसा करा.

४. विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या राष्ट्रीय राजकारणातील कामगिरीचे मूल्यमापन करा.

५. राष्ट्रीय आघाडी सरकारच्या कार्याचे परीक्षण करा.

६. व्ही. पी. सिंग-काँग्रेस संबंधांचा आढावा घ्या.

प्रकरण ८

# भारतीय जनता पक्ष : अटलबिहारी वाजपेयी

**(Bharatiya Janata Party : Atal Bihari Vajpeyi)**

**भारतीय जनता पक्ष**

'भारतीय जनता पक्ष' म्हणून आज ओळखल्या जाणाऱ्या पक्षाचे मूळ दिल्ली येथे २१ ऑक्टोबर, १९५१ रोजी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या जनसंघात आढळते. देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी अस्तित्वात असलेल्या राजकीय पक्षांपैकी 'जनसंघ' हा एक महत्त्वाचा पक्ष होता.


१९७७ साली जनता पक्षात सामील होऊनही त्यात पूर्णतः विलीन होण्याची जनसंघाची तयारी नव्हती. उलट, जनता पक्षाला आपल्या प्रभावाखाली आणण्याचा जनसंघाच्या नेत्यांचा मानस होता. परंतु तो पूर्ण झाला नाही. त्यानंतर मात्र या पक्षाने आपले स्वतंत्र अस्तित्व जपले आहे.

जनता पक्षाच्या विघटनानंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी **भारतीय जनसंघ** आणि **राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** यामधील आपल्या सहकाऱ्यांच्या विशेषतः त्यांचे अनेक वर्षांचे मित्र **लालकृष्ण अडवाणी** व **भैरोसिंग शेखावत** यांच्या साथीने १९८० मध्ये 'भारतीय जनता पक्षा'ची स्थापना केली. तेच भाजपचे पहिले अध्यक्ष झाले. प्रारंभीची पाच वर्षे भाजप अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली.

**'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ'**, **'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद'**, **'भारतीय मजदूर संघ'**, **'विश्वहिंदू परिषद'** इत्यादी संघटना भाजपच्या पूरक संघटना आहेत. पक्षाच्या वैचारिक भूमिका व धोरणे समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत राबविणाऱ्या आणि त्या क्षेत्रांतून पक्षाला पाठिंबा मिळवून बळकटी आणणाऱ्या या संघटना आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भाजपचा मुख्य शक्तिस्रोत आहे. गांधीप्रणीत समाजवादाचा अंगीकार या पक्षाने केला असला तरी जनमानसातील ह्या पक्षाची प्रतिमा हिंदुत्वनिष्ठ, सनातनी, परंपरावादी, संस्कृतिनिष्ठ आणि अल्पसंख्याकांच्या विरोधी अशीच राहिली आहे.

**अटलबिहारी वाजपेयी (जन्म २५ डिसेंबर, १९२४)**

भारतातील एक ज्येष्ठ मुत्सद्दी म्हणून अटलबिहारी वाजपेयी सर्वांना सुपरिचित आहेत. १९९६ मध्ये ते भारताचे ११ वे पंतप्रधान झाले. ते पंतप्रधान पदावर १९९६ मध्ये



अटलबिहारी वाजपेयी

फक्त १३ दिवस आणि त्यानंतर १९९८ २००४ या काळात कार्यरत होते. आपल पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण करणारे ते एकमे बिगर काँग्रेस पंतप्रधान आहेत.

त्यांची संसदीय कारकीर्द चार दशकांपेक्ष अधिक आहे. ते **नऊ वेळा लोकसभेवर** त **दोन वेळा राज्यसभेवर** निवडून आले होते. भूतपूर्व जनसंघाचे ते एक संस्थापक सदस्य असून त्यांनी काही काळ त्याचे नेतृत्व केले होते. जनता पक्ष राजवटीत मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात ते परराष्ट्र व्यवहार खात्याचे मंत्री होते. त्या काळात त्यांनी एक अनुभवी, मुत्सद्दी व आदरणीय राजकीय नेता असे आपले स्थान निर्माण केले होते. जनता पक्षाचे सरकार कोसळल्यानंतर १९८० मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली.

२५ डिसेंबर, २०१४ रोजी त्यांच्या ९० व्या वाढदिवस प्रसंगी भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी अटलजींना **'भारतरत्न'** हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर केला. २७ मार्च, २०१५ रोजी त्यांच्या निवासस्थानी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचा जन्मदिवस 'सुशासन दिन' (Good Governance Day) जाहीर करण्यात आला आहे.

## पूर्वायुष्य व शिक्षण

अटलबिहारी यांचा जन्म २५ डिसेंबर, १९२४ रोजी ग्वाल्हेर येथे एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण ग्वाल्हेर व कानपूर येथे झाले. त्यांनी ग्वाल्हेरच्या व्हिक्टोरिया कॉलेजमधून (हल्लीचे लक्ष्मीबाई कॉलेज) हिंदी, इंग्रजी व संस्कृत हे विषय घेऊन विशेष श्रेणीत पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी कानपूरच्या दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेजमधून राज्यशास्त्र विषयातील एम.ए. पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली. फाळणीच्या वेळी उसळलेल्या दंगलींमुळे त्यांनी आपले कायद्याचे शिक्षण सोडून दिले.

आर्य समाजाची युवा संघटना **'कुमारसभा'** मधून त्यांनी आपले सार्वजनिक काम सुरू केले. कुमारसभेच्या ग्वाल्हेर शाखेचे १९४४ मध्ये ते सरचिटणीस झाले. १९३९ मध्ये एक स्वयंसेवक म्हणून ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामकाजात सामील झाले. १९४७ मध्ये ते संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणजे **'प्रचारक'** बनले. संघाचे **'विस्तारक'**

म्हणून उत्तर प्रदेशात काम करत असताना त्यांनी दीनदयाळ उपाध्यायांचे 'राष्ट्रधर्म' हिंदी मासिक, 'पांचजन्य' साप्ताहिक, 'स्वदेश' व 'वीर अर्जुन' दैनिकांसाठी काम केले.

## प्रारंभीची राजकीय कारकीर्द (१९४२–१९७५)

१९५१ साली स्थापन झालेल्या भारतीय जनसंघ या हिंदुत्ववादी विचारसरणीच्या राजकीय पक्षाचे कार्य करण्यासाठी आर.एस.एस. ने दीनदयाळ उपाध्याय यांच्याबरोबर अटलबिहारी वाजपेयी यांचीही १९५१ मध्ये निवड केली. ते जनसंघाच्या उत्तर विभागाचे प्रभारी राष्ट्रीय सचिव म्हणून दिल्लीत राहून काम करू लागले. त्या कालावधीत वाजपेयी जनसंघाचे ज्येष्ठ नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निकट संपर्कात आले. वाजपेयी त्यांचे अनुयायी व मदतनीस बनले. १९५४ मध्ये डॉ. मुखर्जींनी काश्मीरमध्ये आमरण उपोषण केले तेव्हा वाजपेयी त्यांच्या सोबत होते.

१९५७ मध्ये वाजपेयी प्रथम लोकसभेवर निवडून गेले. लोकसभेतील त्यांच्या वक्तृत्वाने पंतप्रधान जवाहरलाल नेहरू प्रभावित झाले. **वाजपेयी एके दिवशी भारताचे पंतप्रधान होतील, असे भाकीत नेहरूंनी केले होते.** वाजपेयींचे वक्तृत्व आणि संघटन-कौशल्य यामुळे ते जनसंघाचे अग्रगण्य नेते बनले. दीनदयाळ उपाध्याय यांच्या निधनानंतर जनसंघाच्या नेतृत्वाची जबाबदारी तरुण वाजपेयींच्यावर पडली. १९६८ मध्ये ते जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. नानाजी देशमुख, प्रा. बलराज मधोक आणि लालकृष्ण अडवाणी यांच्याबरोबर काम करून त्यांनी जनसंघाला देशाच्या राजकारणात आघाडीवर नेले. १९५७ ते १९७७ या कालावधीत ते जनसंघाच्या संसदीय गटाचे नेते होते.

## राजकीय कारकीर्द (१९७५ ते १९९५)

१९७५ ते १९७७ या पंतप्रधान इंदिरा गांधींनी जाहीर केलेल्या अंतर्गत आणीबाणीच्या काळात विरोधी पक्षांच्या अन्य अनेक नेत्यांप्रमाणे वाजपेयींनासुद्धा अटक करून कारावासात ठेवले होते. १९७७ च्या प्रारंभी लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्या वेळी लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी सर्व विरोधीपक्षांना काँग्रेसविरुद्ध एकजूट करण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत वाजपेयींनी आपला जनसंघ पक्ष जनता पक्षाच्या रूपाने नव्याने तयार होत असलेल्या आघाडीमध्ये विसर्जित केला. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला बहुमत मिळाल्यानंतर तयार झालेल्या मोरारजी देसाई मंत्रिमंडळात अटलजींचा परराष्ट्रमंत्री म्हणून समावेश करण्यात आला होता. देशाचे परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या (UNO) जनरल असेंब्लीत

हिंदी या आपल्या राष्ट्रभाषेतून भाषण केले. त्यामुळे भारतीय नागरिकांचा ऊर अभिमानाने भरून आला.

१९७९ मध्ये मोरारजी देसाईंनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिल्यानंतर थोड्याच काळात जनता पक्षाचे विघटन झाले. त्या वेळी **वाजपेयींनी आपल्या जुन्या सहकाऱ्यांच्या मदतीने जनसंघाचे 'भारतीय जनता पक्ष' या स्वरूपात पुनरुज्जीवन केले.** १९८० मध्ये काँग्रेस (I) पक्ष सत्तेवर आला व श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा एकदा देशाच्या पंतप्रधान झाल्या. त्या वेळी अटलबिहारी वाजपेयी इंदिरा गांधींच्या सरकारचे कठोर टीकाकार बनले. भाजपने पंजाबातील शिखांचा वाढता दहशतवाद आणि हिंसाचार याला विरोध केला. त्याच वेळी देशाचे ऐक्य व एकात्मता यांचा बळी देऊन दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या फाटाफुटीच्या व भ्रष्ट राजकारणाबद्दल त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना दोषी ठरवले. भाजपने अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातील 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' नावाच्या लष्करी कारवाईला पाठिंबा दिला नाही. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत शिखांविरुद्ध भडकलेल्या हिंसाचाराचा भाजपने तीव्र निषेध केला. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला फक्त दोन जागा मिळवता आल्या. या कालावधीत भाजप अध्यक्ष आणि संसदेतील विरोधी पक्षनेते या नात्याने वाजपेयी देशाच्या राजकारणात केंद्रस्थानी राहिले.

विश्वहिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या कार्यकर्त्यांनी अयोध्येत राम जन्मभूमीवर राम मंदिर बांधण्याच्या इराद्याने राम जन्मभूमी मंदिर चळवळ सुरू केली होती. त्याला भाजपने राजकीय अभिव्यक्ती (Political Voice) देण्याचे काम केले.

१९९४-९५ मध्ये पार पडलेल्या काही राज्यविधिमंडळाच्या निवडणुकीत भाजपला चांगले यश मिळाले. त्यामुळे त्या पक्षाची शान वाढली. मार्च, १९९५ मध्ये गुजरात आणि महाराष्ट्र राज्यांतील विधानसभा निवडणुकात भाजपला उल्लेखनीय विजय मिळाला, तर डिसेंबर, १९९४ मध्ये कर्नाटक विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत त्या पक्षाची कामगिरी चांगली झाली. त्यामुळे नोव्हेंबर, १९९५ मध्ये मुंबईत झालेल्या भाजपच्या राष्ट्रीय परिषदेत पक्षाध्यक्ष लालकृष्ण अडवाणी यांनी वाजपेयी भारताचे पंतप्रधान होतील असे आत्मविश्वासाने जाहीर केले.

१९९४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांची **'सर्वोत्कृष्ट संसदपटू' (Best-Parliamentarian)** म्हणून निवड करण्यात आली. त्या वेळी त्यांना देण्यात आलेल्या मानपत्रात पुढीलप्रमाणे त्यांचा गौरव करण्यात आला आहे. "त्यांच्या नावलौकिकाप्रमाणे अटलजी हे एक विख्यात राष्ट्रीय नेते, विद्वान राजकारणी, निःस्वार्थी समाजसेवक, प्रभावी वक्ता,

कवी आणि साहित्यिक, पत्रकार आणि खरोखरच एक बहुढंगी व्यक्तिमत्त्व आहेत. ते आम जनतेच्या आकांक्षा अभिव्यक्त करतात. त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या राष्ट्रवादाशी असलेल्या वचनबद्धतेचा नेहमी प्रत्यय येतो.''

(True to his name, Atalji is an eminent national leader, an erudite politician, self-less social worker, forceful orator, poet and litterateur, journalist and indeed a multi-faceted personality-Atalji articulates the aspirations of the masses-his words ever echo total commitment to nationalism.)

**पंतप्रधान पदाचा कार्यकाल (१९९६ ते २००४)**

विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या सरकारने ७'नोव्हेंबर, १९९० रोजी राजीनामा दिला. १६ मे, १९९६ रोजी अटलबिहारी वाजपेयी यांचा भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. दरम्यानच्या काळात झालेल्या राजकीय घडामोडींचा येथे संक्षिप्त आढावा घेणे अगत्याचे आहे. काँग्रेसच्या पाठिंब्यावर चंद्रशेखर यांचे सरकार १० नोव्हेंबर, १९९० रोजी सत्तारूढ झाले. ५ मार्च, १९९१ रोजी काँग्रेसने चंद्रशेखर सरकारचा आपला पाठिंबा काढून घेतला आणि ते सरकार कोसळले. लोकसभा बरखास्त करून देशात नव्या निवडणुका जाहीर झाल्या. निवडणुकीतील मतदानाची पहिली फेरी पार पडल्यानंतर तमिळनाडूत प्रचार दौऱ्यात काँग्रेस अध्यक्ष व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यांच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीचा काँग्रेस पक्षाला निवडणुकीत फायदा झाला. काँग्रेसला लोकसभेत सर्वांत जास्त म्हणजे २३२ जागा मिळाल्या. काँग्रेस पक्ष हा सर्वांत मोठा पक्ष ठरला. २१ जून, १९९१ रोजी नरसिंह राव यांनी काँग्रेस पक्षाचे सरकार बनविले. केंद्रात सत्तेवर आलेले ते पहिले अल्पमतातील सरकार होते. मात्र नंतर या सरकारला पूर्ण बहुमत प्राप्त झाले व ते सरकार पूर्ण पाच वर्षे टिकले.

१९९६ मध्ये देशात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. १९९५ पासून राष्ट्रीय भावनेच्या लाटेवर आरूढ होऊन भारतीय जनता पक्षाने आपल्या राजकीय सामर्थ्यात चांगलीच वाढ केली होती. त्यामुळे १९९६ च्या निवडणुकीत भाजप हा लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयाला आला. संसदीय भाजपचे नेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांना **तत्कालीन राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा** यांनी सरकार बनविण्यासाठी पाचारण केले. १९९६ ते २००४ या कालखंडात अटलबिहारी वाजपेयी यांनी तीन वेळा भारताचे पंतप्रधान या नात्याने कामगिरी बजावली. पंतप्रधान पदावरील त्यांचे तीन कार्यकाल तुटक तुटक होते.

### (अ) पंतप्रधान पदाचा पहिला कार्यकाल (मे, १९९६)

१६ मे, १९९६ रोजी भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांचा शपथविधी संपन्न झाला. परंतु भाजपला अन्य राजकीय पक्षांकडून आवश्यक तो पाठिंबा मिळवून लोकसभेत बहुमत मिळवण्यात अपयश आले. त्यामुळे १ जून, १९९६ रोजी पंतप्रधान वाजपेयी यांचे सरकार पायउतार झाले. अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधान पदाचा पहिला कार्यकाल अशा प्रकारे केवळ तेरा दिवसांचा झाला.

### (ब) पंतप्रधान पदाचा दुसरा कार्यकाल (१९९८ ते १९९९)

१९९६ ते १९९८ या कालखंडात संयुक्त आघाडीची (United Front) दोन सरकारे एच.डी. देवेगौडा व इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होऊन कोसळली. त्यानंतर लोकसभा बरखास्त होऊन फेब्रुवारी, १९९८ मध्ये लोकसभेच्या नवीन निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांत भाजपला १८२ जागा तर काँग्रेसला फक्त १४७ जागा मिळाल्या. या वेळी भारतीय जनता पक्षाने अण्णा द्रमुक, तृणमूल काँग्रेस व तेलगू देसम अशा धर्मनिरपेक्ष पक्षांचा पाठिंबा मिळवून **'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'–रालोआ,** (National Democratic Alliance-NDA) ची स्थापना केली आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली आपले सरकार बनविले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने अल्पावधीत संसदेत आपले बहुमत सिद्ध केले रालोआ सरकारमध्ये मित्रपक्षांची संख्या खूप होती. मित्रपक्षांतील अंतर्गत वादामुळे वाजपेयींच्या या सरकारलाही फार काळ स्थैर्य लाभले नाही. अण्णा द्रमुक पक्षाच्या प्रमुख जे. जयललिता आघाडीतून बाहेर पडण्याची वारंवार धमकी देत होत्या. त्यामुळे उद्भवणाऱ्या पेचप्रसंगावर मात करण्यासाठी जॉर्ज फर्नांडिस, प्रमोद महाजन आदी राष्ट्रीय नेत्यांना चेन्नईला जाऊन जयललितांची वरचेवर समजूत काढावी लागत होती. सरतेशेवटी मे, १९९९ मध्ये अण्णा द्रमुक पक्ष रालोआमधून बाहेर पडला. त्यामुळे वाजपेयी सरकारपुढे पेचप्रसंग निर्माण झाला. १७ एप्रिल, १९९९ रोजी सरकार संसदेत विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घेऊ शकले नाही. वाजपेयी सरकारचा या वेळी फक्त एका मताने पराभव झाला. अशा प्रकारे वाजपेयी यांचा पंतप्रधान पदाचा दुसरा कार्यकाल फक्त १३ महिन्यांचा ठरला. वाजपेयी सरकारच्या राजीनाम्यानंतर काँग्रेस किंवा अन्य विरोधी पक्ष पर्यायी सरकार बनवू शकले नाही. त्यामुळे लोकसभा विसर्जित करून देशात लोकसभेच्या नव्या निवडणुका जाहीर झाल्या. वाजपेयींच्या नेतृत्वाचे भाजप सरकार काळजीवाहू सरकार म्हणून काम करत होते.

वाजपेयींच्या पंतप्रधान पदाच्या दुसऱ्या कार्यकालात आंतरराष्ट्रीय संदर्भ असलेल्या काही घटना घडल्या, घडामोडी झाल्या. १९९८ मधील भारताच्या आण्विक चाचण्या,

१९९९ ची लाहोर शिखर परिषद आणि १९९९ मध्येच पाकिस्तानबरोबर कारगिल येथे झालेला सशस्त्र संघर्ष या त्या महत्त्वाच्या घडामोडी होत्या.

**१. पोखरण : २, अणुचाचण्या :** भारताच्या इतिहासातील अणुचाचण्यांची दुसरी मालिका मे, १९९८ मध्ये राजस्थानातील पोखरणच्या वाळवंटात घेण्यात आली. या मालिकेत भारताने जमिनीखाली एकूण पाच अणुस्फोट घडवून आणले आणि आपण अण्वस्त्रधारी असल्याचे जाहीर केले. ऑक्टोबर, १९७४ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने पहिली यशस्वी आण्विक चाचणी घेतली होती. त्यानंतर २४ वर्षांनी वाजपेयी सरकारने आण्विक चाचण्या पोखरण या ठिकाणीच घडवून आणल्या. त्यामुळे मे, १९९८ मधील अणुचाचण्यांचा उल्लेख पोखरण २ चाचण्या असा केला जातो.

स्वातंत्र्योत्तर काळातील देशाच्या सर्व सरकारांना भारत हा अण्वस्त्रधारी देश व्हावा असे वाटत होते. जगातील बड्या राष्ट्रांचे आण्विक निःशस्त्रीकरणविषयक अन्याय्य करार आणि आण्विक शस्त्रांनी सज्ज असलेले शेजारी यामुळे सरकारप्रमाणेच देशातील जनताही अणुचाचण्यांना अनुकूल होती. मे, १९९८ मधील अणुचाचणीपर्यंत भारताची भूमिका दुहेरी होती. **आण्विक निःशस्त्रीकरण हवे पण त्याचबरोबर देशाने आण्विक शस्त्राने सज्ज असण्याचा पर्याय हाती ठेवावा,** अशी ती दुहेरी भूमिका होती. त्या भूमिकेला तशीच काही कारणे होती. अण्वस्त्रधारी देशांनी भारताला वेढलेले होते. एका बाजूला चीन भारताचा शेजारी आहे आणि त्या देशाजवळ अण्वस्त्रांचा भरपूर साठा होता. चीनचा तिबेटमध्ये अण्वस्त्र तळ होता. अमेरिकेची अण्वस्त्रधारी आरमारी जहाजे भारताभोवती फिरत होती. त्याचप्रमाणे युक्रेन, कझाकिस्तान व रशियाजवळही अण्वस्त्रे होती. भारताच्या अणुचाचण्यानंतर दोन आठवड्यातच पाकिस्तानने अणुचाचण्या घेऊन आपणही अण्वस्त्रधारी देश असल्याचे जाहीर केले होते. चीन व पाकिस्तान यांचे वाढते सख्य आणि हे दोन्ही देश अण्वस्त्रधारी असणे हा भारताच्या दृष्टीने काळजीचा विषय होता.

पोखरण २ अणुचाचण्यांचे भारतात सर्वत्र स्वागत झाले. मात्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्यांचे वेगवेगळे पडसाद उमटले. पाश्चात्त्य राष्ट्रे व जपान यांनी भारताचा कडक शब्दांत निषेध केला. अमेरिकेने भारतावर अनेक निर्बंध लादले. जपान, ब्रिटन, कॅनडा, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, नेदरलँड यांनी भारतास देण्यात येणारे माहिती, तंत्रज्ञान, साधनसामग्री यांवर बंधने घातली. फ्रान्स, रशिया व जर्मनी यांनी आण्विकदृष्ट्या शस्त्रसज्ज असण्याच्या भारताच्या हक्काला संमती दिली आणि भारताबरोबरचे आपले आर्थिक संबंध सामान्य ठेवले. अणुचाचण्यांमुळे भारतातील परदेशी गुंतवणूक आणि व्यापार यांच्यात मात्र

लक्षणीय घट झाली. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत पोखरण येथे पहिली अणुचाचणी घेतली. त्या वेळी **'शांततेसाठी अणुशक्तीचा उपयोग' (Atom for Peace)** असे जाहीर करण्यात आले होते. पंतप्रधान वाजपेयींनी मात्र पोखरण-२ चाचण्यांच्या वेळी असा युक्तिवाद केला नव्हता. १९९८ च्या अणुचाचण्यांनंतर उद्‌भवलेली राजनैतिक परिस्थिती भारत सरकारने कौशल्याने हाताळून भारत शांतताप्रिय देश असल्याची जाणीव पुन्हा एक वेळ जगाला करून देणे आणि भारताच्या शेजारील देशांनी आपल्या हेतूविषयी संशय न बाळगण्याची ग्वाही देणे भारताच्या दृष्टीने हिताचे ठरले असते.

२. **लाहोर जाहीरनामा** (Lahore Declaration) **:** १९९८ च्या अखेरीस आणि १९९९ च्या सुरुवातीला पंतप्रधान वाजपेयींनी पाकिस्तानबरोबरच्या संबंधात सुधारणा करण्यासाठी संपूर्ण राजनैतिक शांती प्रक्रियेला गती दिली. पाकिस्तानबरोबरच्या काश्मीर समस्येसह अन्य सर्व संघर्षांच्या मुद्द्यांचे कायमस्वरूपी निराकरण करण्याच्या उद्देशाने त्यांनी नवीन शांती प्रक्रिया सुरू केली. त्या शांती प्रक्रियेचा प्रारंभ फेब्रुवारी, १९९९ मध्ये दिल्ली-लाहोर बस यात्रेचे ऐतिहासिक उद्‌घाटन होण्याने करण्यात आला. शांती प्रक्रियेमधून प्रसिद्ध लाहोर जाहीरनामा (Lahore Declaration) काढण्यात आला. लाहोर जाहीरनाम्याने भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांनी आपसातील वादग्रस्त प्रश्नावर वाटाघाटीतून तोडगा काढण्याबद्दलच्या वचनबद्धतेचा पुरस्कार केला. त्याचप्रमाणे दोन्ही देशांतील व्यापारी संबंध आणि परस्पर मैत्री यांची वृद्धी करणे. तसेच दक्षिण आशियाचे आण्विक-नि:शस्त्रीकरण करण्याचे उद्दिष्ट या बाबींचा लाहोर जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला होता. १९९८ च्या अणुचाचण्यांनी केवळ भारत-पाकिस्तानमध्येच नव्हे तर दक्षिण आशिया आणि उर्वरित जगात निर्माण झालेले तणावपूर्ण वातावरण लाहोर जाहीरनाम्याने बरेचसे निवळले.

३. **कारगिल संघर्ष (१९९९) :** पंतप्रधान वाजपेयी यांनी सुरू केलेली लाहोर-दिल्ली बस यात्रा भारत-पाकिस्तान संबंधात नवीन अध्याय सुरू करेल, अशी अपेक्षा होती. परंतु वाजपेयींच्या लाहोर भेटीच्या बरेच अगोदर पाकिस्तानी लष्कर, पाकिस्तानने पाठिंबा दिलेले मुजाहिदीन किंवा धार्मिक अतिरेकी व भाडोत्री दहशतवादी यांनी गुप्तपणे भारतात विशेषतः काश्मीर खोऱ्यात घुसखोरी करण्यास सुरुवात केली होती. मे, १९९९ मध्ये कारगिल प्रकरण उजेडात आले. परंतु त्याच्याही अगोदर पाकिस्तानी अतिरेक्यांनी भारतीय प्रदेशात नियंत्रणरेषेच्या आत आपले ठाण मांडले होते. त्यांनी कारगिल भागातील नियंत्रणरेषेलगतच्या महत्त्वाच्या शिखरांवर कब्जा केला होता. पाकिस्तानी अतिरेक्यांची

घुसखोरी प्रामुख्याने कारगिलच्या अवतीभोवती आणि बटालिक व आखणूर क्षेत्रात केंद्रित झाली होती. सियाचेन परिसरात उभयपक्षात तोफांचा मारा चालू होता.

भारताने पाकिस्तान पुरस्कृत कारवायांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कराच्या तुकड्या त्वरेने काश्मीरमध्ये रवाना केल्या. जून, १९९९ मध्ये काश्मीरमधील अतिरेकी कारवायांचा बीमोड करण्यासाठी भारतीय लष्कराने **'ऑपरेशन विजय'** ही मोहीम हाती घेतली. भारताला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, गैरसोईच्या ठिकाणी अतिरेक्यांच्या लष्करी कारवायांना तोंड देत त्यांच्यावर प्रतिहल्ले चढवावे लागले. कारगिल मोहिमेत भारतीय लष्कराला अति थंड हवामान, बर्फ आणि अति उंचावरील दुर्गम प्रदेश अशा अडचणींना तोंड द्यावे लागले. घुसखोरांना बाहेर काढण्याच्या प्रयत्नात भारताला प्रचंड जीवित व वित्तहानी सोसावी लागली. कारगिलचा हा सशस्त्र संघर्ष सुमारे तीन महिने चालला. या युद्धात पाकिस्तानचीही प्रचंड हानी झाली. भारतीय लष्कराने हल्लेखोरांना पिटाळून लावून आपला ७० टक्के मुलूख परत काबीज केला. भारताबरोबरच्या युद्धात होत असलेल्या पराभवामुळे खचून गेलेला पाकिस्तान भारतावर अण्वस्त्र हल्ला करणार असल्याची कुणकुण लागल्यावर अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांना तातडीने बोलावून घेऊन कोणतीही अतिरेकी कारवाई न करण्याची समज दिली. अमेरिका, ब्रिटन व चीन या पाकिस्तानच्या मित्र देशांनीही पाकिस्तानने भारतीय प्रदेशातून माघार घ्यावी यासाठी पाकवर दबाव आणला. पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ यांनी आपल्या सैनिकांना नियंत्रणरेषेपर्यंत माघार घेण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे पाकिस्तानी सैनिकांनी माघार घेतली. मात्र भाडोत्री दहशतवाद्यांनी शरीफ यांचा आदेश पाळला नाही. पाकिस्तानने सैन्य माघारी घेण्याची घोषणा केल्यानंतर भारतीय प्रदेशात आढळलेल्या दहशतवाद्यांना भारतीय सैन्याने सशस्त्र चकमकीत ठार केले. २६ जुलै, १९९९ ला कारगिल युद्धात भारताचा विजय होऊन युद्ध समाप्त झाले. कारगिलच्या विजयामुळे पंतप्रधान वाजपेयी यांची जनमानसातील प्रतिमा उजळून निघाली. त्यांच्या धाडशी व समर्थ नेतृत्वाची देशभर प्रशंसा झाली.

### (क) पंतप्रधान पदाचा तिसरा कार्यकाल : (१९९९-२००४)

१९९९ मध्ये देशात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. कारगिल युद्धातील भारताच्या विजयाचा या निवडणुकांवर बराच प्रभाव पडला. भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (NDA ला) लोकसभेच्या एकूण ५४३ जागांपैकी ३०३ जागांवर विजय मिळाला. त्यामुळे रालोआला संसदेत निर्विवाद, स्थिर बहुमत प्राप्त झाले. १३ ऑक्टोबर, १९९९ रोजी अटलबिहारी वाजपेयींचा भारताचे

पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा शपथविधी पार पडला. पंतप्रधान पदाच्या तिसऱ्या कार्यकालात (१९९९ ते २००४) वाजपेयी सरकारला काही कठीण पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागले. या काळात वाजपेयी सरकारने आर्थिक सुधारणा, पायाभूत सुविधांचा विकास, परराष्ट्र व्यवहार इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

**१. विमान अपहरण प्रकरण (१९९९) :** डिसेंबर, १९९९ मध्ये काठमांडूहून नवी दिल्लीकडे येणाऱ्या इंडियन एअर लाईन्सच्या IC 814 या विमानाचे पाच दहशतवाद्यांनी अपहरण करून ते जबरदस्तीने तालीबानी वर्चस्वाखालील अफगाणिस्तानमध्ये कंदाहारला नेले. त्यामुळे वाजपेयी सरकारपुढे गंभीर राष्ट्रीय पेचप्रसंग उभा राहिला. विमानात असलेले प्रवासी व कर्मचारी यांना दहशतवाद्यांनी ओलीस ठेवले होते. अपहरणकर्त्यांनी मौलाना मसूद अजहरसारख्या काही दहशतवाद्यांना तुरुंगातून सोडण्यासह अन्य अनेक मागण्या सरकारकडे केल्या. जबरदस्त दडपणाखाली सरकारला शेवटी नमते घ्यावे लागले. अपहरणकर्त्यांनी ज्यांच्या सुटकेची मागणी केली होती अशा दहशतवाद्यांना बरोबर घेऊन देशाचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग अफगाणिस्तानला गेले. तेथे त्यांनी दहशतवाद्यांना अपहरणकर्त्यांकडे सुपूर्द करून त्या विमान उड्डाणातील सर्व प्रवासी व कर्मचारी यांची सुखरूप सुटका करून घेतली.

**२. संसदेवर दहशतवादी हल्ला (२००१) :** १३ डिसेंबर, २००१ रोजी बुरखाधारी सशस्त्र दहशतवाद्यांचा एक गट बनावट ओळखपत्रे वापरून नवी दिल्ली येथे संसदभवन परिसरात घुसला. दहशतवाद्यांच्या गटाने संसदभवनाच्या परिसरातील अनेक सुरक्षा रक्षकांना ठार केले आणि संसदभवन परिसरात प्रचंड दहशत निर्माण केली. परंतु सुरक्षादलाच्या जवानांनी प्रसंगावधान राखून संसदभवन इमारतीभोवती सुरक्षाकडे तयार करून अतिरेक्यांना सर्व बाजूने वेढले. सुरक्षा रक्षकांबरोबर झालेल्या चकमकीत सर्व हल्लेखोर अतिरेकी मारले गेले. तपासाअंती हल्लेखोर दहशतवादी पाकिस्तानी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. पाकिस्तान सरकारने भारताच्या संसदभवनावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अधिकृतपणे निषेध केला. मात्र भारतीय गुप्तचर यंत्रणेच्या अहवालानुसार संसदेवरील हल्ल्याचा कट पाकिस्तानात तयार झाल्याचे स्पष्ट झाले.

**३. गुजरातमधील दंगल (२००२) :** २००२ साली गुजरात राज्यात भीषण हिंदू-मुस्लीम दंगल भडकली. त्या दंगलीत प्रचंड हिंसाचार झाला. त्या हिंसाचारात १००० पेक्षा अधिक लोक ठार झाले. पंतप्रधान वाजपेयींनी गुजरातमधील हिंसाचाराचा अधिकृतपणे निषेध केला. तथापि, गुजरातमधील हिंसाचार थांबविण्यासाठी केंद्र सरकार व पंतप्रधान वाजपेयी यांनी काहीच केले नाही, असा आरोप करण्यात आला. दंगलग्रस्त गुजरातमधील

गुंतागुंतीची परिस्थिती हाताळण्यात चुका झाल्याचे नंतर मान्य करण्यात आले. देशाचे तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायण यांनी गुजरातमधील हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरल्याबद्दल वाजपेयी सरकारला दोषी ठरविले.

**४. संघ परिवाराचे दडपण :** भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारवर त्याचा वैचारिक सल्लागार 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि जहाल 'विश्वहिंदू परिषद' यांचे हिंदूत्ववादी कार्यक्रम पत्रिका राबविण्यासाठी सतत प्रचंड दडपण होते. परंतु राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटकपक्षांच्या पाठिंब्यावर सरकार अवलंबून असल्यामुळे भाजपला अयोध्या येथे वादग्रस्त जागेवर राम मंदिर बांधणे, काश्मीरला खास दर्जा बहाल करणारे राज्यघटनेतील ३७० वे कलम रद्द करणे, देशातील सर्वधर्मीय नागरिकांना समान नागरी कायदा लागू करणे असे विषय रेटून पुढे नेणे अशक्य होते. १७ जानेवारी, २००० रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपमधील काही जहाल मंडळींनी पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे पुनरुज्जीवन करण्याची धमकी दिली असल्याचे वृत्त होते. जनसंघाचे भूतपूर्व अध्यक्ष प्रा. बलराज मधोक यांनी त्या संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन प्रमुख राजेंद्र सिंग यांना पत्र पाठवून पाठिंब्याची मागणी केली होती. एका बाजूला अशा घडामोडी चालू असताना भाजपवर शासकीय शिक्षण संस्थामधील शैक्षणिक अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकासारखी शैक्षणिक साधने यांचे भगवेकरण करत असल्याचे आरोप होत होते.

डिसेंबर, २००१ ते मार्च, २००२ या कालावधीत विश्वहिंदू परिषदेच्या अत्यंत आक्रमक भूमिकेमुळे वाजपेयी सरकारवर सर्वांत मोठी राजकीय आपत्ती कोसळली. अयोध्येत राम मंदिर उभारण्याच्या प्रश्नावरून मोठा पेचप्रसंग निर्माण करून विश्वहिंदू परिषदेने भारत सरकारलाच वेठीस धरले. बाबरी मशिदीच्या विध्वंसनाच्या दहाव्या स्मृतिदिनी अयोध्येतील वादग्रस्त जागेवर राम मंदिराचा पायाभरणी समारंभ करण्याचा विश्वहिंदू परिषदेचा (विहिंपचा) अट्टाहास होता. त्यासाठी अयोध्येत जमा झालेल्या विहिंपच्या हजारो कार्यकर्त्यांनी मंदिराची वादग्रस्त जागा काबीज करून त्यावर जबरदस्तीने मंदिर बांधणार असल्याची धमकी दिली होती. धार्मिक संघटनेने शासन आदेश न मानल्यामुळे उद्भवणाऱ्या भीषण जातीय हिंसाचाराची केवळ भीतीच नव्हे तर कायदा व सुव्यवस्था परिस्थितीचा संपूर्ण बिघाड होण्याच्या शक्यतेने संपूर्ण देशाला काळजीत टाकले. परंतु या पेचप्रसंगावर अत्यंत शांतपणे मात करणे वाजपेयी सरकारला शक्य झाले. त्यामुळे भाजपसहित राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्व घटकपक्षांना दिलासा मिळाला.

**५. बदनामीकारक प्रकरणे :** (Scandals) : वाजपेयींच्या पंतप्रधान पदाच्या तिसऱ्या कार्यकालात उद्भवलेल्या काही बदनामीकारक प्रकरणामुळे व घोटाळ्यामुळे भाजप आणि सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांची जनमानसातील प्रतिमा बरीच डागळली होती. मार्च, २००१ मध्ये 'तेहलका' ग्रुपने गुप्तपणे छायाचित्रण करून तयार केलेली 'ऑपरेशन वेस्ट एंड' नावाची ध्वनिमुद्रित चित्रफीत (video) प्रसारित केली. त्यामध्ये भाजपचे तत्कालीन अध्यक्ष बंगारू लक्ष्मण, ज्येष्ठ लष्करी अधिकारी आणि रालोआचे सदस्य दलाल आणि उद्योगपती यांच्या रूपात वावरणाऱ्या पत्रकारांच्याकडून लाच स्वीकारत असताना दिसून आले आणि ते सर्व प्रकरण तत्काळ जगजाहीर झाले.

बराक क्षेपणास्त्र व्यवहारातील घोटाळा, कारगील युद्धात शहीद झालेल्या जवानांच्या मृतदेहासाठी लागणाऱ्या शवपेट्यांच्या पुरवठ्यात झालेला घोटाळा आणि कारगिल प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या आयोगाच्या अहवालातील सरकारवर ठपका ठेवणारे निष्कर्ष यामुळे वाजपेयी सरकारमधील तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. या सर्व बदनामीकारक प्रकरणांना आणि घोटाळ्यांना तोंड देताना वाजपेयी सरकारची पुरती दमछाक झाली.

**परराष्ट्र धोरण**

जागतिक राजकारण हा पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या आवडीचा विषय होता. त्याचबरोबर त्यांनी आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे परराष्ट्र धोरण या बाबींचाही अत्यंत बारकाईने सखोल अभ्यास केला होता. आपल्या देशाच्या हितसंबंधांची जोपासना करण्याच्या भूमिकेतून त्यांनी भारताच्या परराष्ट्र संबंधांचे स्वरूप निश्चित केले. पंतप्रधान पदाच्या त्यांच्या तिसऱ्या कार्यकालात वाजपेयींनी शीतयुद्धोत्तर जागतिक राजकारणातील एकमेव महासत्ता अमेरिका आणि पाकिस्तान व चीन हे दोन आपले शेजारी देश यांच्याबरोबरच्या 'राजनैतिक' संबंधांना अग्रक्रम दिला. आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधात त्यांनी कौशल्याने समतोल राखला.

**(अ) भारत-अमेरिका संबंध : प्रे. क्लिंटन यांची भारत भेट (२०००)**

मार्च, २००० मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी भारताला अधिकृत भेट दिली. क्लिंटन यांचा भारत दौरा ही अमेरिकेच्या अध्यक्षांची बावीस वर्षांनंतर भारताला होत असलेली पहिलीच भेट होती. त्यामुळे प्रे. क्लिंटन यांच्या भारत भेटीकडे भारत-अमेरिका या उभयदेशांच्या संबंधातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहण्यात आले. दोन वर्षांपूर्वी झालेल्या भारताच्या पोखरण-२ अणुचाचण्या, एक वर्षापूर्वीचे कारगिल आक्रमण व त्यानंतर पाकिस्तानमध्ये झालेला लष्करी उठाव अशा

घडामोडींच्या पार्श्वभूमीवर प्रे. क्लिंटन यांची भारत भेट होत होती. त्यामुळे या भेटीत शीतयुद्धोत्तर काळातील अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतराचा प्रत्यय येईल अशी अपेक्षा होती. भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी राजनैतिक डावपेचात्मक प्रश्नांची (Strategic issues) चर्चा केली. परंतु दोन्ही देशांदरम्यानच्या व्यापारी व आर्थिक संबंधांचा झालेला विस्तार ही प्रे. क्लिंटन यांच्या भारत भेटीची महत्त्वाची फलनिष्पत्ती ठरली. प्रे. क्लिंटन यांच्या भारत यात्रेच्या वेळी उभय देशांमधील भविष्यकालीन संबंधांच्या स्वरूपाचा निर्देश करणाऱ्या संयुक्त पत्रकावर पंतप्रधान वाजपेयी व प्रे. क्लिंटन यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

## (ब) भारत–पाकिस्तान संबंध

कारगिल संघर्षानंतर भारत-पाकिस्तान यांच्यातील गोठलेले संबंध पुन्हा सामान्य करण्याचा अटलबिहारी वाजपेयी यांनी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल परवेझ मुशर्रफ यांना दिल्ली व आग्रा भेटीसाठी आणि शांततेसाठी वाटाघाटी करण्याच्या निमित्ताने संयुक्त शिखर बैठकीसाठी भारत भेटीचे निमंत्रण दिले. दोन देशांच्या संबंधातील कोंडी फोडण्याचा वाजपेयींचा हा दुसरा मोठा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी भारतावर कारगिल आक्रमण करणाऱ्या माणसाला भारत भेटीला बोलावले. जनरल मुशर्रफ यांना पाकचे अध्यक्ष म्हणून स्वीकारून पंतप्रधान वाजपेयींनी शांती प्रक्रिया पुढे नेण्याचा निर्धार केला. जनरल मुशर्रफ यांच्या तीन दिवसांच्या भारत भेटीचा बराच गाजावाजा झाला. त्यांनी दिल्लीतील आपल्या जन्मस्थळाला व आग्र्याच्या ताजमहालला भेट दिली. परंतु शांतता बोलण्यातून दोन देशांच्या संबंधांतील कोंडी फोडण्यात मात्र अपयश आले. प्रे. मुशर्रफ यांनी उभयपक्षी चर्चेतून काश्मीरचा प्रश्न वगळणे अमान्य केले. त्यामुळे शिखर बैठक अयशस्वी ठरली.

भारत-पाकिस्तान संबंध सामान्य करण्यात अपयश आल्यानंतर पंतप्रधान वाजपेयींनी भारतीय लष्कराला पाकसीमेलगत सज्ज राहण्याचे आदेश दिले. सुमारे पाच लाख सैनिक गुजरात, राजस्थान, पंजाब आणि काश्मीरलगतच्या भारत-पाकिस्तानमधील आंतरराष्ट्रीय सीमेवर तैनात करण्यात आले. पाकिस्ताननेही आपले लष्कर भारत-पाक सीमेवर सज्ज ठेवले. त्यामुळे भारत-पाक सीमेवरील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली. काश्मीरमधील दहशतवादी हल्ले आणि दहशतवादविरोधी आक्रमक लष्करी मोहिमा यामुळे तेथील दैनंदिन जनजीवन अगदी ठप्प झाले. भारत-पाकिस्तान यांच्यातील संभाव्ययुद्ध आणि त्यामध्ये होणाऱ्या अण्वस्त्रांच्या वापराची शक्यता याच्या भीतीने

भारत व पाकिस्तानमधील परकीय नागरिक देश सोडून निघून गेले. भारत व पाकिस्तान जवळ- जवळ दोन वर्षे भीषण युद्धाच्या छायेत राहिले.

ऑगस्ट, २००३ मध्ये पंतप्रधान वाजपेयींनी आपण पाकिस्तानबरोबर शांततापूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा अगदी अखेरचा प्रयत्न करणार असल्याचे संसदेत जाहीर केले. त्या दृष्टीने आवश्यक ती राजनैतिक प्रक्रिया खऱ्या अर्थाने कधीच गतिमान झाली नाही. मात्र दोन्ही देशांतील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या परस्परांच्या देशांना भेटींचे आदान-प्रदान झाले आणि त्यामुळे भारत-पाकिस्तान यांच्यातील लष्करी पेचप्रसंग संपुष्टात आला. पंतप्रधान वाजपेयींनी भारत-पाक संबंधातील शांती प्रक्रिया पुनः सुरू करण्यात घेतलेल्या पुढाकाराची पाकिस्तानच्या अध्यक्षासह त्या देशातील राजकीय नेते, नागरी आणि धार्मिक नेते यांनी प्रशंसा केली. त्याचप्रमाणे अमेरिका, युरोप आणि जगाच्या अनेक भागांतील मुत्सद्यांनी वाजपेयींच्या सकारात्मक भूमिकेबद्दल त्यांना धन्यवाद दिले.

### (क) भारत-चीन संबंध

जुलै, २००३ मध्ये पंतप्रधान वाजपेयींनी चीनला भेट दिली. या भेटीत त्यांनी चीनच्या अनेक नेत्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी परस्पर सहकार्याबद्दल चर्चा केली. या भेटीत वाजपेयींनी तिबेट हा चीनचा भाग असल्याचे मान्य केले. वाजपेयींच्या या भूमिकेचे चिनी नेत्यांनी स्वागत केले. त्याचप्रमाणे पुढील वर्षी चिनी नेतृत्वाने सिक्कीम हा भारताचा भाग असल्याचे मान्य केले. वाजपेयींच्या भेटी नंतरच्या कालखंडात चीन-भारत संबंधात बरीच सुधारणा झाली.

### अंतर्गत सुधारणा

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या पदाच्या तिसऱ्या कार्यकालात अनेक अंतर्गत सुधारणांचा प्रारंभ केला. त्यामध्ये आर्थिक सुधारणा आणि पायाभूत सुविधांचा विकास या प्रमुख बाबी होत्या. अंतर्गत सुधारणा कार्यक्रमात खाजगी क्षेत्राचा विकास आणि परकीय गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, संशोधन आणि विकास, शासकीय महामंडळांचे खाजगीकरण करणे, सरकारी उधळपट्टी कमी करणे इ. महत्त्वाच्या बाबींचा समावेश होता. **'राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प'** आणि **'प्रधानमंत्री ग्रामसडक योजना'** हे वाजपेयींचे दोन आवडते प्रकल्प होते. देशात गेल्या बत्तीस वर्षांत तयार झालेल्या रस्त्यांपैकी निम्मे रस्ते वाजपेयींच्या पंतप्रधान पदाच्या अखेरच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत झाल्याचे संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ, UPA) सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. त्यांच्याच कारकिर्दीत देशातील **राष्ट्रीय महामार्गांचा सुवर्ण चतुष्कोण** तयार झाला.

भारतीय जनता पक्ष : अटलबिहारी वाजपेयी

पायाभूत सुविधांचा विकास, व्यापार, गुंतवणूक

पी. व्ही. नरसिंह राव पंतप्रधान असताना सुरू करण्यात आलेल्या आर्थिकसुधारणा कार्यक्रमांना गती देऊन तो पुढे नेण्याची कामगिरी वाजपेयी सरकारने बजावली. १९९६ पासून देशात अस्थिर सरकार असल्यामुळे आणि १९९७ मध्ये आशियाई देशात निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे भारतातील आर्थिक सुधारणा प्रक्रिया ठप्प झाली होती. वाजपेयींनी उद्योगधंद्यांना पूरक, खुल्या बाजारपेठेला अनुकूल सुधारणांना चालना देऊन भारतातील आर्थिक परिवर्तन व अर्थव्यवस्थेचा विस्तार यांना नवसंजीवनी दिली. वाजपेयींच्या कार्यकालात माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आणि उच्च तंत्रज्ञानाधिष्ठित उद्योगधंदे यांना सरकारने दिलेले पाठबळ, जादा निधी, त्यांची वाढलेली स्पर्धात्मकता, त्याशिवाय पायाभूत सुविधांचा झालेला विकास, व्यापार आणि गुंतवणूक यांच्यावरील निर्बंध काढून टाकल्यामुळे भारतातील परकीय भांडवली गुंतवणुकीत झालेली वाढ इत्यादीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विस्ताराला चालना मिळाली.

वाजपेयींच्या आर्थिक सुधारणांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सतत टीका करत होता. भारत सरकारच्या खुल्या बाजारपेठेच्या धोरणामुळे देशात परकीय मालाची आवक वाढते आणि त्यांच्याशी कराव्या लागणाऱ्या स्पर्धेचा स्वदेशी उद्योगधंद्यांवर व उत्पादनांवर प्रतिकूल परिणाम होतो, असा त्यांचा मुख्य आक्षेप होता.

वाजपेयी सरकारने कर पद्धतीत सुधारणा केल्या, आर्थिक सुधारणांची गती वाढवली, उद्योगधंद्यांना अनुकूल योजना बनविल्या, तसेच मोठ्या जलसिंचन व गृहबांधणी योजना राबविल्या, २००२-२००३ या काळात देशातील आर्थिक सुधारणांना सरकारने अधिक गती दिली. देशातील परकीय गुंतवणुकीत झालेली वाढ, सार्वजनिक आणि औद्योगिक पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, रोजगारनिर्मिती, उदयोन्मुख माहिती तंत्रज्ञान व उच्च तंत्रज्ञान उद्योग आणि नागरी भागाचे आधुनिकीकरण यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा तेजस्वी झाली. देशाची अशी प्रगती होत असताना **वाजपेयी सरकारला 'भारतीय मजदूर संघ' व 'भारतीय किसानसंघ' या संघ परिवारातील बलवान संघटनांच्या कडव्या विरोधाला तोंड द्यावे लागले.**

देशातील आर्थिक सुधारणांप्रमाणे वाजपेयी सरकारने काही शैक्षणिक सुधारणांची सुरुवात केली होती. २००१ मध्ये त्या सरकारने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने **'सर्वशिक्षा अभियान'** ही प्रसिद्ध योजना कार्यान्वित केली.

2001 सर्वशिक्षा अभियान

## २००४ च्या सार्वत्रिक निवडणुका

नोव्हेंबर-डिसेंबर, २००३ मध्ये राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठा विजय मिळाला. त्यावरून देशातील मतदारांची सरकारला अनुकूल मानसिकता असल्याचे पक्षधुरीणांनी गृहीत धरले. देशातील जनतेच्या या कथित अनुकूल मानसिकतेचा (Feel good factor) फायदा करून घेण्याच्या हेतूने सत्ताधारी भाजपने मुदतीपूर्वीच १३ वी लोकसभा बरखास्त करून लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या. भाजपला 'इंडिया शायनिंग' घोषणा आणि देशाच्या आर्थिक विकासाचा ढोल वाजविणाऱ्या घोषणा यांच्या जोरावर निवडणुका जिंकता येतील असे वाटत होते. परंतु प्रत्यक्ष निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (NDA चे) लोकसभेतील संख्याबळ निम्म्याने घटले. वाजपेयी मंत्रिमंडळातील अनेक प्रमुख मंत्री निवडणूक हरले. सोनिया गांधींच्या नेतृत्वाखालील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस लोकसभेतील सर्वांत मोठा पक्ष ठरला. काँग्रेसने अनेक लहान पक्षांना बरोबर घेऊन 'संयुक्त पुरोगामी आघाडी'-संपुआ (United Progressive Alliance - UPA) ची स्थापना केली. डाव्या पक्षांनी काही अटींवर त्या आघाडीला बाहेरून पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर संयुक्त पुरोगामी आघाडीचे डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार तयार झाले. वाजपेयींनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आणि नव्या सरकारला सहकार्याचे आश्वासन दिले.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून वाजपेयींनी १४ व्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते पद स्वत: न स्वीकारण्याचा निर्णय घेतला व ते पद आपले ज्येष्ठ सहकारी लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे सोपविले. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अध्यक्षपद मात्र वाजपेयींनी स्वत:कडे ठेवले.

## सक्रिय राजकारणातून निवृत्ती

डिसेंबर, २००५ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांनी सक्रिय राजकारणातून आपण निवृत्त होत असल्याची घोषणा केली. त्याच वेळी यापुढे आपण निवडणूक लढविणार नसल्याचेही त्यांनी जाहीर केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते २००९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाच्या प्रचार मोहिमेत सहभागी होऊ शकले नाहीत. सध्या ते दिल्ली येथे आपली मानसकन्या नमिता हिच्याकडे राहतात. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते घराबाहेरही पडू शकत नाहीत. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेत बोलताना **'भारतीय राजकारणातील भीष्म पितामह'** अशा शब्दात वाजपेयींचा गौरव केला होता. भारतीय जनता पक्षाचे भूतपूर्व अध्यक्ष व्यंकय्या नायडू यांनी वाजपेयी यांना

16 Aug 2018



'विकास पुरुष' (Man of Progress) म्हटले होते. नुकतेच (जून, २०१५ मध्ये) बांगला देश सरकारने, वंगबंधू मुजीबूर रेहमान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा, प्रतिष्ठेचा 'मुक्तिसंग्राम सन्मान' अटलबिहारी वाजपेयींना प्रदान केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाजपेयींच्यावतीने तो ढाक्का येथे स्वीकारला.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. भारतीय जनसंघ पक्षाची स्थापना ....... मध्ये झाली.

(अ) १९४८ (ब) १९५० (क) १९५१ (ड) १९५२

२. भारतीय जनता पक्षाची स्थापना ....... मध्ये करण्यात आली.

(अ) १९७५ (ब) १९७७ (क) १९७९ (ड) १९८०

३. ..... भारतीय जनता पक्षाचा वैचारिक सल्लागार असल्याचे मानले जाते.

(अ) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (ब) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

(क) विश्व हिंदू परिषद (ड) जनसंघ

४. अटलबिहारी वाजपेयी ....... वेळा लोकसभेवर निवडून आले होते.

(अ) ७ (ब) ९ (क) १० (ड) ११

५. भारताने अणुचाचण्या घेतलेले पोखरण ....... राज्यात आहे.

(अ) आंध्र (ब) केरळ (क) गुजरात (ड) राजस्थान

६. कारगिल युद्धाच्या वेळी ....... पाकिस्तानचे पंतप्रधान होते.

(अ) बेनझीर भुत्तो (ब) नवाज शरीफ

(क) परवेज मुशर्रफ (ड) शहाबाज शरीफ

७. १९९९ मध्ये भारतीय विमानाचे अपहरण प्रकरण उद्‌भवले तेव्हा ..... भारताचे परराष्ट्रमंत्री होते.

(अ) जसवंतसिंग (ब) यशवंत सिन्हा

(क) जॉर्ज फर्नांडिस (ड) प्रमोद महाजन

८. अटलबिहारी वाजपेयींनी ..... मध्ये चीनला भेट दिली.

*(अ) २००१ (ब) २००२ (क) २००३ (ड) २००४*

९. ....... राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (रालोआ, NDA) अध्यक्ष होते.

*(अ) अटलबिहारी वाजपेयी (ब) लालकृष्ण अडवाणी*

*(क) बंगारू लक्ष्मण (ड) व्यंकय्या नायडू*

१०. ..... यांनी वाजपेयींचे 'भारतीय राजकारणातील भीष्म पितामह' असे वर्णन केले आहे.

*(अ) डॉ. मनमोहन सिंग (ब) डॉ. मुरलीमनोहर जोशी*

*(क) लालकृष्ण अडवाणी (ड) व्यंकय्या नायडू*

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) भारतीय जनता पक्ष (ब) पोखरण-२

(क) लाहोर जाहीरनामा (ड) कारगिल संघर्ष

(इ) २००४ ची सार्वत्रिक निवडणूक (फ) लालकृष्ण अडवाणी.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. वाजपेयीकालीन भारत-पाकिस्तान संबंधांचे परीक्षण करा.

२. वाजपेयींच्या अंतर्गत सुधारणांचा आढावा घ्या.

३. वाजपेयींच्या पंतप्रधान पदाच्या दुसऱ्या कार्यकालाचे परीक्षण करा.

४. अटलबिहारी वाजपेयींच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

❖❖❖